रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I वर्ष ८९ I अंक १९६ I पृष्ठे १०+४+४ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in



रायगड, सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

सिस्टर आणि वॉर्ड बॉय पाहिजे.
शिक्षण व अनुभवनुसार पेमेंट
दिले जाईल.
डॉ. घुगे ऑरोकेअर सुपर स्पेशालिटी
हॉस्पिटल रामनाथ-अलिबाग
संपर्क- ८३९०४५५५६५/९९२३५०६७७९/
७५०६३२९९११




# रायगड जिल्ह्यात शिंदे गटाला जोरदार धक्का

**I रायगड I जिल्हा प्रतिनिधी I**

- **मतदारांनी शिंदे गटाच्या नगराध्यक्षांना नाकारले**
- **उरणमध्ये भाजप आ. बालदींच्या सत्तेला सुरूंग**

रायगड जिल्ह्यातील दहा नगपरिषदांच्या निवडणुकांचा निकाल रविवारी जाहीर झाला. या निवडणुकीत अलिबागवगळता अन्य नगरपरिषदांमध्ये प्रचंड फेरबदल झाले. दहापैकी पेणमध्ये भाजप, अलिबागमध्ये शेकाप, श्रीवर्धनमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गट, उरणमध्ये महाविकास आघाडी तसेच मुरूड, रोहामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट आणि कर्जतमध्ये परिवर्तन विकास आघाडी, महाड, माथेरान, खोपोली नगरपरिषदेवर शिदें गटाचे उमेदवार निवडून आले आहेत. अलिबाग, उरण व श्रीवर्धनमध्ये महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष विराजमान झाले आहेत. रायगडात शिंदे गटाचे तीन-तीन आमदार असूनही, अपेक्षित यश मिळवता आले नाही. त्यामुळे या निवडणुकीत शिंदे गटासह महायुतीला धक्का बसला आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, रोहा, महाड, श्रीवर्धन, पेण, खोपोली, कर्जत, माथेरान, उरण या दहा नगरपरिषदांची मतमोजणी अठरा दिवसांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर रविवारी (दि.२१) पार पडली. सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात झाली. अलिबाग नगरपरिषद नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक या बहुमतांनी निवडून आल्या. नगरसेवकपदाच्या वीस जागांपैकी १७ जागा जिंकत महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसची सत्ता नगरपरिषदेवर कायम राहिली.

श्रीवर्धन हा खासदार तटकरे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. नगरपरिषदेच्या निवडणुकीत तटकरे समर्थक नगराध्यक्षपदाचे उमेदवार पराभूत झाले आहेत. तसेच महाडमध्ये नगरपरिषदेवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी स्नेहल जगताप यांना आपल्या पक्षात घेतले. प्रचंड मोर्चेबांधणी करण्यात आली होती. या निवडणुकीत प्रचंड जोर लावला होता. परंतु, खासदार तटकरे यांना श्रीवर्धनसह महाडमध्ये मोठा धक्का बसला आहे.

उरणमध्ये भाजपचे आमदार महेश बालदी यांनी या निवडणुकीत प्रचंडमेहनत घेतली होती. महाविकास आघाडीने चांगली कामगिरी केल्याने बालदी यांना निवडणुकीत चांगलाच दणका मिळाला. बालदी यांचे उमेदवार पराभूत झाले. महाविकास आघाडीचे उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आले. त्यामुळे बालदी यांनादेखील मोठा धक्का दिल्याचे बोलले जात आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत मतदारांना आकर्षण करण्यासाठी भाजपने अनेक आमिषं दाखविली होती. परंतु, अलिबागकरांनी भाजपच्या आमिषाला बळी न पडता, शेकाप व काँग्रेसच्या उमेदवारांना बहुमतांनी निवडून दिल्याने भाजपला एकावर समाधान मानण्याची वेळ आली. अलिबाग सोडले तर अन्य नगरपरिषदेवर प्रचंड फेरबदल झाला आहे. या फेरबदलाचा फटका आगामी निवडणुकीत बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## अलिबाग, कटोलमध्ये
# शेकापचे वर्चस्व

शेतकरी कामगार पक्षाने अलिबाग नगरपरिषदेवरील ४० वर्षांची सत्ता कायम राखत निर्विवाद वर्चस्व राखले. नगराध्यक्षपदी अक्षया प्रशांत नाईक यांची वर्णी लागली असून, त्यांनी भाजपाच्या उमेदवाराचा दारुण पराभव केला. तर, नागपूरच्या काटोळ नगरपरिषदेवरसुद्धा लाल बावटा दिमाखात फडकला असून, शेकापच्या अर्चना देशमुख यांनी नगराध्यक्षपदी बाजी मारली आहे.

**सविस्तर वृत्त पान ३ वर**

**अलिबागमधील विजयाची क्षणचित्रं पुरवणी पान ४ वर**

# निवडणुकीचा निकाल जाहीर

**I मुंबई I प्रतिनिधी I**

राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीचा निकाल रविवारी जाहीर झाला. यामध्ये राज्यात महायुतीला मोठं यश मिळालं आहे. महायुतीचे तीन पक्ष भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट मिळून तब्बल २१५ नगराध्यक्षपदाचे उमेदवार विजयी झाले आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे.

महाविकास आघाडीला अवघ्या ५० जागांवरच समाधान मानावं लागलं आहे. राज्यात भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, ११८ ठिकाणी भाजपच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर शिवसेना शिंदे गटाला देखील चांगला यश मिळालं आहे, शिवसेना शिंदे गटाचे ५८ नगराध्यक्ष निवडून आले आहेत. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ३७ उमेदवार विजयी झाले आहेत. काँग्रेसला ३१ जागा मिळाल्या तर शिवसेना ठाकरे गटाला ९ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला १० जागा मिळाल्या आहेत.

सत्ताधारी पक्षाकडून साम, दाम, दंड, भेद या नीतीचा मुक्तपणे वापर करण्यात आला आहे. या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचा विजय हा निवडणूक आयोगामुळेच झाला आहे, अशी टीका विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे.




सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. अजित नामदेव भगत
मा.उपसरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, पेझारी
डॉ. सायली अजित भगत
माजी सरपंच ग्रुप ग्रामपंचायत पेझारी
अलिबाग तालुका आपत्कालीन वैंदयकीय
सं. सदस्य
ॲड. पूजा अजित भगत
रायगड जिल्हा व अलिबाग
अलिबाग तालुका अधिवक्ता
बार असोसिएशन सदस्य
कु. साहिल अजित भगत
अलिबाग विद्यार्थी संघटना सदस्य

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १९६ | पृष्ठे १०+४+४ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹


## सुप्रिया पाटील, चित्रलेखा पाटील यांचा आज अभीष्टचिंतन सोहळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, तसेच शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा अभीष्टचिंतन सोहळा सोमवारी (दि.२२) आयोजित करण्यात आला आहे. अलिबागमधील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात सकाळी अकरा वाजता हा सोहळा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यानिमित्ताने अलिबाग नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक यांचा विशेष सत्कारदेखील करण्यात येणार असल्याची माहिती तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी दिली. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक आदींसह वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तरी, असंख्य कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका चिटणीस सुरेश घरत, अलिबाग तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे यांनी केले आहे. या अभीष्टचिंतन सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात असून, जोरदारपणे सुरू आहे.

(छायाचित्र : समीर मालोदे)






# अलिबागमध्ये शेकापच

## नगराध्यक्षपदी अक्षया नाईक यांचा दणदणीत विजय

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी । अलिबाग नगरपरिषद निवडणुकीत शेतकरी कामागर पक्षाने दणदणीत विजय मिळवून ४० वर्षांची सत्ता कायम राखत नगरपरिषदेवर आपले सिंहासन अबाधित ठेवले आहे. प्रशासकीय राजवटीनंतर झालेल्या या निवडणुकीत अलिबागकरांनी स्पष्ट कौल देत शेकापच्या हाती शहराच्या सत्तेची सूत्रे पुन्हा एकदा सोपवली आहेत. त्यामुळे थेट नगराध्यक्षपदासह नगरसेवकपदाच्या महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या उमेदवारांनी घवघवीत यश संपादन केले. मागील अनेक वर्षांची वर्चस्वाची परंपरा शेकापने कायम ठेवली. नगरसेवकपदाच्या २० जागांपैकी १७ जागा शेकापच्या हातात आल्या असून, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नमिता प्रशांत नाईक बहुमतांनी निवडून आल्या. या निवडणुकीत महायुतीच्या नेत्यांनी अपप्रचार करीत मतदारांना वेगवेगळी आमिषं दाखवून भुलविण्याचा प्रयत्न केला. परंतु, मतदारांनी त्यांच्या कोणत्याही भूलथापांना भीक न घालता त्यांना स्पष्टपणे नाकारले आहे. विरोधी उमेदवारांचे डिपॉझिट जप्त करण्याइतपत त्यांची केविलवाणी अवस्था झाल्याचे दिसून आले. दुसरीकडे विजयी उमेदवारांसह कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष केला.

### नगरसेवकपदाच्या 20 पैकी 17 जागांवर महाविकास आघाडीचा झेंडा

**कमळ कोमजले**
भाजपच्या उमेदवाराचा
**8974**
मतांनी पराभव

अलिबाग नगरपरिषद निवडणुकीत अक्षया नमिता प्रशांत नाईक नगराध्यक्षपदाच्या उमेदवार होत्या. त्यांनी मतमोजणीत सुरुवातीपासूनच आघाडी मारत भाजपच्या तनुजा पेरेकर यांना पराभवाची धूळ चारली. शेकापच्या अक्षया नाईक यांना आठ हजार ९७४ मते मिळाली असून, भाजपच्या तनुजा पेरेकर यांना दोन हजार ३३४ मतांवर समाधान मानावे लागले. पेरेकर यांचा दारुण पराभव झाल्याने आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. फटाक्यांच्या आतषबाजीसह लाल गुलाल सर्वत्र उडविण्यात आला. प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वावर खुश होऊन अलिबागकरांनी शेतकरी कामगार पक्षाच्या हाती पुन्हा एकदा नगरपरिषदेची सत्ता दिली. ‘शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो’ असा जयघोष करीत विजयाचा आनंद कार्यकर्त्यांनी मनमुरादपणे लुटला. नगरसेवकपदाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी यश संपादन करून विजय आपल्या हाती कायम ठेवला. प्रभाग दोनमधील नगरसेवकपदाचे उमेदवार प्रशांत नाईक बिनविरोध निवडून आले. तर, अन्य १६ असे एकूण १७ नगरसेवकपदाचे उमेदवार विजयी झाले.

प्रभाग एकमधील संतोष मधुकर गुरव यांना ५४६ मते मिळाली आहेत. संध्या शैलेश पालवणकर यांना ७८२ मते मिळाली आहेत. प्रभाग दोनमधील उमेदवार सुषमा नित्यानंद पाटील यांना ६५७ मते मिळाली आहेत. प्रभाग तीनमधून ॲड. साक्षी गौतम पाटील यांना ८३३ मते मिळाली आहेत. आनंद अशोक पाटील यांना ९०२ मते मिळाली आहेत. प्रभाग पाचमधील ॲड. निवेदिता राजेंद्र वाघमारे यांना एक हजार १३६, समीर मधुकर ठाकूर यांना एक हजार २३३ मते मिळाली आहेत. प्रभाग सहामधील ॲड. ऋषीकेश रमेश माळी यांना ३९६, ॲड. अश्विनी ठोसर यांना ३७६ मते मिळाली आहेत. प्रभाग सातमधील ॲड. मानसी संतोष म्हात्रे यांना ७८६ मते मिळाली. प्रभाग आठमधील ॲड. निलम किशोर हजारे यांना ७७६, अनिल रमेश चोपडा यांना ६८८ मते मिळाली. प्रभाग नऊमधील योजना प्रदीप पाटील यांना एक हजार १४१, सागर शिवनाथ भगत यांना ८४० मते मिळाली आहेत. प्रभाग दहामधील शैला शेषनाथ भगत यांना ७५९ व वृषाली महेश भगत यांना ९३४ मते मिळाली आहेत. तसेच प्रभाग चारमधील उमेदवार रेश्मा थळे यांना ३९१, महेश शिंदे यांना५३२ आणि प्रभाग सातमधील उमेदवार अभय म्हामुणकर यांना ५२९ मते मिळाली. या निवडणुकीत शिंदे गटातील उमेदवार विजया पार्से कर, कृष्णनाथ चाळके, तसेच अपक्ष उमेदवार उमा आठवले यांचा डिपॉझिट जप्त झाले आहे. त्यामुळे शिंदे गटातील उमेदवारांना चांगलाच दणका मिळाला असल्याचे चित्र दिसून आले.

## काटोलच्या नगराध्यक्षपदी शेकापच्या अर्चना देशमुख

- सांगलीत तीन जागी नगरसेवकांची बाजी
- राज्यातील अनेक नगरपरिषदांमध्ये शेकापचे नगरसेवक

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

मुख्यमंत्र्यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील काटोल नगरपरिषदेच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाने मोठा राजकीय धक्का देत थेट नगराध्यक्षपदावर लाल बावटा फडकवला आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे सहचिटणीस राहुल देशमुख यांच्या पत्नी अर्चना देशमुख नगराध्यक्ष म्हणून बहुमतांनी निवडून आल्या आहेत. तसेच सांगली नगरपरिषद निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे तीन नगरसेवकपदाचे उमेदवारांनी बाजी मारली आहे. रमेश जाधव, दिव्यानी दौंडे, श्रद्धा साबळे अशी नगरसेवकांची नावे आहेत. रायगडसह अन्य जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकांमध्ये शेतकरी कामगार पक्षाने आपले वर्चस्व राखले आहे. तळागाळापर्यंत काम करणाऱ्या तसेच गोरगरीबांचे प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्यावर उतरणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाला मतदारांनी पसंती दर्शविली असल्याचे दिसून आले आहे.



**धनुष्यबाण तुटला**
शिंदे गटाच्या
**2**
उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

### तिघांवर डिपॉझिट जप्तीची नामुष्की

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीत शेतकरी कामगार पक्षाने घवघवीत यश मिळवून महायुतीच्या उमेदवारांना धूळ चारली आहे. प्रभाग चारमधील शिंदे गटातील उमेदवार विजया पार्सेकर यांना ६० मते मिळाली असून, कृष्णनाथ चाळके यांना ४९ मते मिळाली आहेत. तसेच अपक्ष उमेदवार उमा आठवले यांना ५७ मतांवर समाधान मानावे लागले. शिंदे गटातील दोन उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहेत. एकूण तीन उमेदवारांवर डिपॉझिट जप्तीची नामुष्की ओढावली.

## एकीमुळे वर्चस्व कायम : जयंत पाटील

शेतकरी कामगार पक्षासह काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी झोकून देऊन या निवडणुकीत काम केले आहे. त्यामुळे हा घवघवीत विजय प्राप्त झाला आहे. अलिबाग नगरपरिषदेमधील असलेला हा पॅटर्न शेवटपर्यंत ठेवायचा आहे. या निवडणुकीत काही विरोधकांची डिपॉझिट जप्त झाली आहेत. अलिबाग नगरपरिषदेवर गेल्या ४० वर्षांपासून शेतकरी कामगार पक्षाची सत्ता आहे. ही परंपरा आजही कायम ठेवली आहे. अगदी कमी वयातील व उच्चशिक्षित, अनेक भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या अक्षया नाईकच्या रुपाने अलिबाग नगरपरिषदेला नगराध्यक्ष मिळाला आहे. सर्वाधिक मते घेण्याचा विक्रम अक्षया नाईक यांनी केला आहे, असे गौरवोद्गार शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी काढत, नगरपरिषदेवर वर्चस्व एकीमुळे झाल्याचे ते म्हणाले.



अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत यश संपादन केल्यावर अलिबागमधील शेकाप भवन येथे रविवारी (दि. २१) कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जयंत पाटील बोलत होते. याप्रसंगी जयंत पाटील म्हणाले की, अलिबाग तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेसची मक्तेदारी होती. काँग्रेसने देशात चांगले काम केले आहे. ते काम पुसून टाकण्याचे काम भाजपचे सरकार करीत आहेत. मात्र, देशात महाविकास आघाडी स्थापन झाली. शेकापसह काँग्रेस व अन्य पक्ष एकत्र आले. महाविकास आघाडीतून ही निवडणूक लढविण्यात आली आहे. या निवडणुकीत शेकापसह काँग्रेसनेही जिद्दीने काम केले आहे. उद्याच्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत एकत्र काम करायचे आहे. त्या पद्धतीने प्रत्येक कार्यकर्त्याने कामाला लागले पाहिजे, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

## अलिबागचे कामकाज पारदर्शक होणार : ॲड. गौतम पाटील



अक्षया नाईक यांच्या रुपाने नगराध्यक्षपदासाठी एक नवीन चेहरा अलिबागकरांना मिळाला आहे. उच्चशिक्षित तसेच राजकीय वारसा असलेली अक्षया नाईक हिने कमी वयात नगराध्यक्ष होण्याचा विक्रम मोडीत काढला आहे. २२ वर्षांची नगराध्यक्ष म्हणून महाराष्ट्रात तिने एक वेगळे नाव निर्माण केले आहे. प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखाली अलिबागमध्ये एक वेगळे वर्चस्व प्रस्थापित केले आहे. अक्षया नाईक यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग शहरातील कामकाज पारदर्शक व स्वच्छ होईल, अशी अपेक्षा आहे. साक्षी पाटील व आनंद पाटील यांनादेखील चांगली मते देऊन त्यांना निवडून दिले आहेत. त्यामुळे अलिबागकरांचे मनापासून आभार मानतो, असे शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील म्हणाले.

## अलिबागच्या विकासासाठी कटिबद्ध : चित्रलेखा पाटील



शेतकरीकामगारपक्षाचीसत्ता अलिबाग नगरपरिषदेवर कायम राहिली आहे. अलिबागकरांनी भरघोस मतांनी उमेदवारांना निवडून दिले आहे. अलिबागची शान व मान राखण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे या विजयाचे श्रेय संपूर्ण अलिबागकरांना दिले जात आहे. काही उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला. परंतु, ‘बचेंगे तो और लढेंगे’ या भूमिकेतून पुन्हा काम करायचे आहे. शेकापचे नेते जयंत पाटील हे आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान आहेत. प्रशांत नाईक यांनी आपल्या कामातून अलिबागकरांची मने जिंकली आहेत. त्यांची कन्या अक्षया नाईक या नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत. आपल्या आई, वडिलांप्रमाणे अलिबागच्या विकासासाठी पाच वर्षात ती स्वतःला झोकून देईल, असा विश्वास आहे. त्यामुळे शेकाप अलिबागच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

## अलिबागकरांच्या प्रेमामुळे विजय : अक्षया नाईक

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या उमेदवारांना जनतेने निवडून दिले आहे.



अलिबागकरांच्या प्रेमामुळे हा विजय मिळाला आहे. त्यांच्या प्रेमामुळे नगराध्यक्ष म्हणून उभी आहे. त्याचे सर्व श्रेय संपूर्ण अलिबागकरांना जात आहे. शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा जनतेमुळेच पुन्हा नगरपरिषदेवर फडकला आहे. असेच प्रेम कायम ठेवा, अलिबागच्या विकासासाठी कायम प्रयत्नशील राहणार, असा विश्वास नवनिर्वाचित नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी व्यक्त केला.

# अजून न झालेला भूकंप

अमेरिकेतल्या जेफ्री एपस्टीनच्या भानगडीमुळे भारतात भूकंप होणार आहे अशी चर्चा चालू होती. पृथ्वीराज चव्हाण गेले काही दिवस तसे भाकित करीत होते. चव्हाण हे सनसनाटी बोलून प्रसिध्दी मिळवणाऱ्यांपैकी नाहीत. त्यामुळे अनेक जण सावधपणे वाट पाहत होते. पण काल-परवा १९ डिसेंबरला अमेरिकेत याबाबत जे काही उघड झाले त्यातून तूर्तास तरी भारताशी संबंधित खळबळजनक काही बाहेर आलेले नाही. त्यामुळे तो अपेक्षित भूकंप अजून तरी झालेला नाही. पण यापुढे तो होणारच नाही असा मात्र त्याचा अर्थ नाही. हे सर्व प्रकरण अमेरिकी भांडवलशाहीतली अत्यंत विकृत दलदल दाखवणारे आहे. एपस्टीन हा एक भयंकर श्रीमंत म्हणता येईल असा इसम होता. वॉशिंग्टनच्या सत्तावर्तुळात वावरणारा अत्यंत सामर्थ्यवान असा हा दलाल होता. शेअर बाजार, बड्या कंपन्या, सिनेमा धंदा, संरक्षण क्षेत्र, मिडिया या सर्वच क्षेत्रांमधल्या बड्या लोकांशी लगट करणे, एकमेकांचे संबंध जोडून देणे आणि त्यातून आपले महत्व वाढवणे अशी दलालगिरी करणारे लोक दिल्लीपासून वॉशिंग्टनपर्यंत सर्वत्र असतात. फरक इतकाच की अमेरिका ही जगातली महासत्ता असल्याने तिथल्या दलालांच्या जाळ्यात फक्त अमेरिकेचे नव्हे तर जगभरातल्या प्रमुख देशांचे नेते, उद्योगपती असे असू शकतात. एपस्टीनच्या बाबतीत तेच झाले होते. तमाम बड्या श्रीमंत व सत्ताधारी मंडळींना मुली व बायका पुरवणे ही याची विशेष खासियत होती. त्यातही लहान वयांच्या मुलींना या धंद्यात ओढणे व त्यांचा वापर करून घेणे ही याची खास अशी विकृती होती. याची स्वतःच्या मालकीची एक प्रचंड इस्टेट होती. आपल्या खास जेट विमानातून तो या बड्या मंडळींना तेथे घेऊन जाई. पार्ट्या करी. तेथे त्यांचे वाट्टेल ते छंद पुरवले जात. पण हे एवढ्यावरच थांबत नसे. हा दलाल त्या मुलींचे तसेच या बड्या मंडळींचे फोटो व व्हिडियो तयार करी. त्यातून तो बहुदा दोघांनाही ब्लॅकमेल करी व पैसे उकळी किंवा आपली कामे करून घेई. आपले धंदे बाहेर येऊ नयेत यासाठीही या फोटो व व्हिडियोंचा उपयोग त्याला होत असला पाहिजे.

### दडपादडपी

एपस्टीनच्या या धंद्यांबाबत १९९० च्या दशकात तक्रारी झाल्या. पण याचे अध्यक्ष बिल क्लिंटनपासून सगळ्यांशी संबंध असल्याने पोलिसांनी या तक्रारी दडपून टाकल्या. पण अमेरिकी पोलिसी व न्यायव्यवस्था भारतापेक्षा थोडी बरी आहे. त्यामुळे तिथे अखेर या गुन्ह्यांना वाचा फुटली व एपस्टीन तुरुंगात गेला. आणि, सिनेमात घडावे त्याप्रमाणे या अलिबलाढ्य दलालाचा तुरुंगात मृत्यू झाला. त्याने गळफास लावून आत्महत्या केली असे दाखवण्यात आले. पण कोणाचाही त्याच्यावर विश्वास नाही. त्याला ठार मारण्यात आले असाच सर्वांचा निष्कर्ष आहे. एपस्टीन ठार झाला तरी त्याच्या चौकशी व खटल्याच्या रुपाने त्याचे भीषण अनाचार जिवंत होते व आहेत. त्यात डोनाल्ड ट्रम्पपासून अनेक जागतिक नेते गुंतलेले आहेत. या लोकांचे एपस्टीनशी जवळचे संबंध होते व त्यांनी एपस्टीनच्या पार्ट्या व तो पुरवत असलेल्या तथाकथित सेवांचा लाभ घेतला होता असे दर्शवणारे पुरावे या खटल्याच्या कागदपत्रांमध्ये आहेत. ही कागदपत्रे खुली झाली पाहिजेत अशी ट्रम्प यांच्या निवडणूक प्रचारातली मागणी होती. मात्र ट्रम्प निवडून आल्यावर ती उघड करण्यात टाळाटाळ होऊ लागली. परिणामी ट्रम्प यांच्याबाबतच शंका घेतली जाऊ लागली. निव्वळ जनतेच्या दबावामुळे शुक्रवारी अखेर ही कागदपत्रे खुली करणे भाग पडले. मात्र त्यातील अनेक छायाचित्रे झाकलेली आहेत. पत्रे वा कागदपत्रांमधील मजकूर काळ्या पट्टीखाली दडवलेला आहे. उदाहरणार्थ, क्लिंटन बायकांसमवेत पोहण्याच्या तलावात डुंबत आहेत किंवा क्लिंटन यांच्या मांडीवर कोणी महिला बसलेली आहे अशी काही छायाचित्रे यातून उघड झाली. पण ती नेमकी कधीची व कोणत्या प्रसंगातील आहेत, त्यातील व्यक्तींची नावे काय वगैरे गोष्टी कळत नाहीत. काही पत्रे किंवा मेल्स उघड झाले आहेत, पण त्यातही मोक्याचा तपशील वगळलेला आहे. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाने गोष्टी उघड करण्याऐवजी त्या दडपण्यासाठीच अधिक मेहनत केलेली दिसते आहे. यापुढे आणखीही अनेक कागदपत्रे पुढच्या टप्प्यात उघड होणार आहेत. त्यातीलही तपशील असेच दडपले जातात की कसे हे पाहावे लागेल.

### भाजपने स्वतःच खुलासा करावा

याच कागदपत्रांमध्ये नरेंद्र मोदींच्या नावाचा उल्लेख आहे असे आरोप यापूर्वी झाले आहेत. ट्रम्प यांच्या सल्लागाराने मोदींची भेट घडवण्यासाठी एपस्टीनची मदत घेतली होती व मोदी भेटीला तयार आहेत असे पत्र पाठवले होते असा आरोप सुब्रमण्यम स्वामी व इतरांनी यापूर्वी केला होता. तशा आशयाचे कोणतेही कागदपत्र निदान या पहिल्या टप्प्यात बाहेर आलेले नाहीत. मोदींच्या मंत्रिमंडळातील मंत्री हरदीपसिंग पुरी हे पूर्वी अमेरिकेत राजदूत होते. त्यांचाही एपस्टीनशी जवळचा संबंध होता व मोदी व एपस्टाईनमधले मध्यस्थ तेच होते असाही एक तर्क लढवला जात आहे. पण त्याचा पुरावा बाहेर आलेला नाही. १९ डिसेंबरला हा पुरावा बाहेर आला की मोदींना राजीनामा द्यावा लागेल व देवेंद्र फडणवीस देशाचे पंतप्रधान होतील अशा आशयाचे भाकित पृथ्वीराज चव्हाण यांनी केले होते. एरवी भाजपवाले अशा गोष्टींवर तुटून पडतात. पण यावेळी त्यांची प्रतिक्रिया गपचुपीची होती. आता पृथ्वीराज यांचे म्हणणे खोटे ठरूनही भाजपवाले तुलनेने शांत आहेत. कारण, १९ डिसेंबरला नसले तरी पुढच्या टप्प्यात मोदींचे नाव उघड होणारच नाही असे कोणीही सांगू शकत नाही. एपस्टीन हा एक दलाल होता. तो खोटारडाही असू शकेल. त्याने मोदी किंवा कोणाचे नाव घेतले किंवा त्याच्यासोबत कोणाचे फोटो असले म्हणजे त्याच्या घाणेरड्या धंद्यांची या नेत्यांना माहिती होती किंवा ते त्यात सामील होते असा त्याचा अर्थ होतो असे नाही. मात्र तरीही कोवळ्या मुलींना देहव्यापारात लोटणारे सैतानी एपस्टीनसारखे लोक क्लिंटन किंवा मोदी इत्यादींच्या वर्तुळात सहज वावरतात हेही पुरेसे बोलके असते. या नेत्यांभोवतीचे सत्तावर्तुळ अत्यंत भ्रष्ट व चिखलाने भरलेले असले पाहिजे असा त्याचा एक निष्कर्ष निघतो. हे नेते प्रत्यक्ष दोषी असोत वा नसोत, पण यांच्या भोवतीचे वर्तुळ जर असे असेल तर त्यांच्या सत्तेच्या चारित्र्याबाबतच शंका निर्माण होतात. मनमोहनसिंग हे स्वतः अत्यंत स्वच्छ व प्रामाणिक होते हे प्रत्येक भारतीयाला ठाऊक होते. पण त्यांच्या भोवतीचे वर्तुळ बदनाम झाल्यावर मनमोहनसिंग यांनाच त्याबद्दल जबाबदार धरले गेले होते याची आठवण या निमित्ताने करून द्यावी लागेल. असो. आता यापुढच्या काळात कागदपत्रांमधून काय बाहेर येते याची वाट न पाहता, भाजपने स्वतःहूनच खरे तर या प्रकरणाचा खुलासा करायला हवा. एपस्टीनसोबत पुरी किंवा अन्य कोणाचा संबंध कधी, कोणत्या स्थितीत व का आला होता याची माहिती त्यांनी स्वतःहूनच उघड करायला हवी. अन्यथा, यात काहीतरी दडवले जात आहे की काय आणि अमेरिकी ट्रम्प प्रशासन या निमित्ताने भारताला ब्लॅकमेल तर करीत नाही ना या शंका लोकांच्या मनात येत राहतील.

विचार

# भारत-तुर्कस्तानचा परस्परांना शह-काटशह

***भारतासोबतच्या संबंधांमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, तुर्की इतर देशांशीही संबंध मजबूत करत आहे. पाकिस्तानला तुर्कीचा पाठिंबा सर्वश्रुत असला, तरी बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका, मालदीवसारख्या देशांमध्ये त्याचा वाढता प्रभाव भारतासाठी चिंतेचा विषय बनला आहे. या प्रयत्नांना तोंड देण्यासाठी भारत ग्रीस, सायप्रस आणि अर्मेनियासारख्या तुर्कीच्या प्रतिस्पर्ध्यांशी आपली भागीदारी मजबूत करण्यावर भर देत आहे.***




**प्रा. जयसिंग यादव**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला. 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत पाकिस्तानमधील शंभरहून अधिक दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. जगभरातून पाकिस्तानच्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. फक्त तुर्कस्तानसह काही मूठभर पाकिस्तानधार्जिण्या देशांचा काय तो अपवाद. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी तुर्कस्तानने पाकिस्तानला ड्रोन पुरवले. तेव्हापासून भारत आणि तुर्कीमधील संबंधांमध्ये बिघाड वाढला. पाकिस्तानने या संघर्षादरम्यान भारतीय लष्करी तळ आणि नागरी क्षेत्रांना लक्ष्य करण्यासाठी तुर्कीने पुरवलेल्या ड्रोनचा वापर केला. या ड्रोनमध्ये असीस्गार्ड आणि सोंगर सारख्या मॉडेल्सचा समावेश होता. नंतर भारताने या मुद्द्यावर तुर्कीकडे चिंता व्यक्त केली. तुर्की गेल्या अनेक वर्षांपासून पाकिस्तानला एफ-१६ फायटिंग फाल्कन जेट आणि बायरक्तर ड्रोन पुरवत आहे. तुर्की हा केवळ पाकिस्तानचा दुसरा सर्वात मोठा शस्त्रास्त्र पुरवठादार देश नाही, तर त्याच्या जवळच्या मित्रांपैकी एक आहे. भारतासाठी दीर्घकाळापासून चिंता असलेल्या काश्मीर मुद्द्यावर पाकिस्तानला त्याने सातत्याने पाठिंबा दिला आहे. लष्करी उपकरणे पुरवण्याव्यतिरिक्त तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांनी मे महिन्यातील संघर्षादरम्यान पाकिस्तानला समर्थन दिले. या तणावातच भारत २९ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे आयोजित तुर्कीच्या राष्ट्रीय दिन समारंभापासून दूर राहिला. त्यानंतर लगेचच मीडिया रिपोर्टसनुसार, नोव्हेंबरमध्ये, तुर्कीने अमेरिकेची अपाचे हेलिकॉप्टर भारताला मिळण्यातही अडथळा आणला. त्यांना त्यांच्या हवाई हद्दीतून उड्डाण करण्याची परवानगी नाकारली.

भारताच्या शेजाऱ्यांसोबत तुर्कीच्या वाढत्या संरक्षण कारवाया हिंदी महासागर प्रदेशावरील वाढत्या लक्षाचे प्रतिबिंब आहेत. भारताच्या जवळच्या मानल्या जाणाऱ्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेशमध्ये सत्तेवरून घालवल्यानंतर तुर्कीने मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारशी लष्करी संबंध अधिक मजबूत केले आहेत. ३ नोव्हेंबर रोजी तुर्कीच्या संसदीय शिष्टमंडळाला भेटल्यानंतर, युनूस म्हणाले, की बांगलादेश आपल्या लोकांसाठी नवीन संधी उघडण्यासाठी तुर्कीसोबत काम करण्यास तयार आहे. बांगलादेश तुर्कीकडून अनेक लष्करी उपकरणे खरेदी करण्यासाठी चर्चा करत आहे. त्यात बायरक्तार टीबी-२ ड्रोन, टीआरजी-३०० रॉकेट सिस्टीम आणि ओटोकर तलपर लाईट टँक यांचा समावेश आहे. लष्करी बातम्या देणाऱ्या बांगलादेशी वेबसाइटनुसार, बांगलादेश तुर्कीकडून 'शिपर' लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणाली खरेदी करण्याचा विचार करत आहे. काही भारतीय माध्यमांच्या वृत्तांनुसार, वाटाघाटी आधीच सुरू आहेत. बांगलादेश पारंपारिकपणे शस्त्रास्त्रांसाठी चीनवर अवलंबून राहिला असला, तरी तो आता तुर्कीकडून शस्त्रे खरेदी करत आहे. बांगलादेश २०२२ मध्ये तुर्कीचा सर्वोच्च शस्त्रास्त्र खरेदीदार बनला.

बांगलादेशसोबतच्या वाढत्या मैत्री संबंधामुळे तुर्कीला बंगालच्या उपसागरात एक धोरणात्मक उपस्थिती मिळाली आहे. त्यामुळे काळ्या समुद्रापासून हिंदी महासागरापर्यंत त्याचा प्रभाव वाढतो. नोव्हेंबर २०२३ मध्ये मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइझ्झू यांनी पदभार स्वीकारल्यानंतर इस्तंबूलला पहिली भेट दिली. त्यानंतर मालदीव या आणखी एका हिंदी महासागरीय राष्ट्राशी तुर्कीने सहकार्य वाढले. या वर्षी मार्चमध्ये तुर्कीने मालदीवला स्वदेशी विकसित सशस्त्र ड्रोन दिले. त्यानंतर एप्रिलमध्ये तुर्कीने एक जुने नौदल जहाजदेखील भेट दिले. यापूर्वी, जानेवारी २०२४ मध्ये मालदीवने त्यांच्या विशेष आर्थिक क्षेत्राचे निरीक्षण करण्याची घोषणा केली. तुर्कीकडून लष्करी ड्रोन खरेदी करण्यासाठी ३७ दशलक्ष डॉलरचा करार करण्यात आला. २२ ते २७ जुलैदरम्यान इस्तंबूल येथे झालेल्या संरक्षण मेळाव्यात तुर्कीने भारताच्या आणखी एका शेजारी देशाशी, श्रीलंकेशी सहकार्य करार केला. जूनच्या सुरुवातीला तुर्की नौदल युद्धनौका कोलंबोमध्ये बंदिस्त होती. श्रीलंकेने तिचे वर्णन 'वाढत्या संरक्षण सहकार्याचे प्रतीक' असे केले होते. गेल्या आठवड्यात जोहान्सबर्ग येथे झालेल्या जी-२० शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी अंगोलाचे अध्यक्ष जोआओ लोरेन्को यांच्याशी हस्तांदोलन केले आणि एर्दोगान यांनी जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्याशी हस्तांदोलन केले; परंतु मोदी आणि एर्दोगन यांच्यात एकाच व्यासपीठावर असूनही राजशिष्टाचार म्हणूनही हस्तांदोलन झाले नाही. या देहबोलीतून दोन देशांमधील बिघडलेल्या संबंधाचे चित्र स्पष्ट होत होते.

भारतीय माध्यमांच्या एका गटाचे म्हणणे आहे, की लष्करी सहकार्य मजबूत करण्याव्यतिरिक्त तुर्की भारताच्या शेजारी आपली गैर-लष्करी उपस्थिती आणि प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. तुर्कीच्या परराष्ट्र मंत्रालयाने ऑगस्ट २०१९ मध्ये आशियाई देशांसोबत सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने 'आशिया: एक नवीन उपक्रम'ची घोषणा केली. तुर्कीच्या सरकारसमर्थक येनी सफाक वृत्तपत्रात २९ मे रोजी प्रकाशित झालेल्या एका वृत्तात असेही म्हटले आहे, की दक्षिण आशियातील तुर्कीचा वाढता प्रभाव भारतासाठी चिंतेचा विषय बनला आहे. 'फर्स्ट पोस्ट' या भारतीय वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या एका भाष्यात म्हटले आहे, की एर्दोगान इस्लामिक जगाचा नेता बनण्याचा प्रयत्न करत आहेत. पाकिस्तान हा तुर्कीचा कनिष्ठ भागीदार असून यातील वैचारिक स्पर्धेत सहभागी आहे. तुर्की बांगलादेशमध्ये अनेक उच्चस्तरीय संवादांमध्ये सक्रिय आहे. यामध्ये इस्लामी पक्ष 'जमात-ए-इस्लामी'शी संपर्कदेखील समाविष्ट आहे. भारतीय गुप्तचर सूत्रांचा हवाला देत सीएनएन-न्यूज१८ च्या एका अहवालात दावा करण्यात आला आहे, की तुर्की गुप्तचर संस्था बांगलादेशमधील इस्लामी गटांना, विशेषतः कट्टरपंथी 'जमात-ए-इस्लामी'ला आर्थिक आणि लॉजिस्टिक सहाय्य करत आहे. तुर्की त्यांच्या 'टीआयकेए' या सरकारी मदत एजन्सीद्वारे बांगलादेशमधील रोहिंग्या निर्वासितांना महत्त्वपूर्ण मदत करत आहे.

नेपाळमध्ये तुर्की सरकारच्या निधीतून चालणाऱ्या 'आयएचएच' या स्वयंसेवी संस्थेने कार्याचा विस्तार केला आहे. ते अल्पसंख्याक मुस्लिम लोकसंख्येसाठी मशिदी, मदरसे आणि इस्लामिक केंद्रांच्या बांधकामासाठी निधी देत आहे. तुर्कीची कार्यपद्धती दुहेरी असल्याचे दिसून येते. ती वैचारिक प्रभावासाठी मानवतावादी संपर्काचा वापर करत असतानाच राजकीय किंवा धोरणात्मक हेतूंसाठी वापरता येणारे आंतरराष्ट्रीय नेटवर्क तयार करत आहे. भारतीय मुख्य प्रवाहातील माध्यमांनी सूचित केले आहे, की भारत सरकार तुर्कीचे प्रतिस्पर्धी ग्रीस, सायप्रस आणि आर्मेनिया यांच्याशी भागीदारी करण्यावर पुन्हा भर देत आहे. दक्षिण आशियाच्या सुरक्षा क्षेत्रात तुर्कीचा अनपेक्षित प्रवेश भारताला असणाऱ्या धोक्याच्या गणितात बदल घडवत आहे. तुर्की आता दूरचा निरीक्षक राहिलेला नाही. तो सक्रिय अडथळा निर्माण करणारा देश बनला आहे. 'आयएनएस त्रिकंद'ने १७-१८ सप्टेंबर रोजी ग्रीक नौदलाच्या जहाजांसह नौदल सराव केला. २४ सप्टेंबर रोजी सायप्रस नौदलासोबत असाच एक सराव झाला. हे संयुक्त सराव तुर्कीसाठी अडचणी निर्माण करू शकतात. शेजारी ग्रीसशी तुर्कीचे दीर्घकाळापासूनचे वैर आहे. तुर्कीच्या प्रतिस्पर्ध्यांसोबत नौदलाच्या सहभागाचा संदर्भ देत भारत पूर्व भूमध्यसागरीय आणि दक्षिण काकेशसमध्ये निर्णायकपणे आपली उपस्थिती दर्शवत आहे, तो तुर्कीच्या प्रादेशिक प्रभावाला धोरणात्मक प्रतिसाद देण्याचे संकेत देतो, असे एका वृत्तात म्हटले आहे.

तुर्की आणि भारताचे व्यापारी संबंध मध्यम स्वरुपाचे आहेत; परंतु अलिकडेच तुर्कीविरुद्धच्या निदर्शनांमुळे आणि प्रवास निर्बंधांमुळे यावर परिणाम झाला आहे. भारतातील तुर्की गुंतवणुकीचाही आढावा घेतला जात आहे. राष्ट्रीय हितसंबंधांवर परिणाम झाल्यास तुर्की कंपन्यांना प्रकल्पांमधून काढून टाकले जाऊ शकते. सायप्रसच्या उत्तरेकडील भागावरील नियंत्रणावरून तुर्कीशी संघर्ष करणाऱ्या सायप्रसच्या सार्वभौमत्वाला आणि एकतेला भारत पाठिंबा देतो. त्यामुळे दोन देशांच्या व्यूहरचना परस्परांना शह-काटशह देणाऱ्या आहेत, हे स्पष्ट होते.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# अलिबाग तालुका पर्यटकांनी गजबजणार

**वैष्णवी वाडकर**

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा मानला जातो. जिल्ह्यातील समुद्रकिनारे, ऐतिहासिक किल्ले, निसर्गरम्य वातावरण आणि धार्मिक स्थळे यामुळे देशभरातून पर्यटक येथे आकर्षित होतात. त्यातच जिल्ह्यातील अलिबाग शहर पर्यटकांचे खास आकर्षण ठरत आहे. रायगडातील अलिबाग शहर हे पर्यटनाचे मुख्य केंद्र असून प्रशासकीय मुख्यालयदेखील याठिकाणी आहे. अलिबाग परिसरातील समुद्रकिनारे, मंदिरे, किल्ले यांसह स्थानिक खाद्यसंस्कृती, हिरवेगार शेत, वाड्या यांमुळे येथे वर्षभर पर्यटकांची गर्दी असते. मात्र, सणासुदीच्या व सुट्टीच्या काळात ही गर्दी अधिक पटींनी वाढते. आता शाळा, महाविद्यालयांना नाताळची सुट्टी जाहीर होणार असून सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी अनेकजण आपल्या कार्यालयांतून सुट्टी घेऊन फिरण्याचा बेत आखत आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत अलिबाग तालुका पर्यटकांनी बहरणार असल्याचे बोलले जात आहे.

मुंबई आणि पुण्यापासून अलिबाग अगदी जवळ असल्याने नाताळ सण आणि 'थर्टी फर्स्ट' साजरा करण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक याठिकाणी येत असतात. त्यामुळे येत्या काही दिवसांत अलिबाग तालुका पूर्णपणे पर्यटकांनी गजबजणार असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. हिंदू नववर्ष गुढीपाडव्याला सुरू होत असले तरी ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री इंग्रजी नववर्षाचे स्वागत करण्याची परंपरा गेल्या काही वर्षांत वाढली आहे. कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच ऑफिस ग्रुपसोबत मज्जा मस्ती करता यावी, यासाठी अनेकजण अलिबागसारख्या पर्यटनस्थळांची निवड करतात. अलिबाग तालुक्याला लाभलेला मोठा समुद्रकिनारा हा येथील पर्यटनाचा महत्वाचा भाग आहे. त्यामुळे शनिवार-रविवार, सार्वजनिक सुट्ट्या तसेच नाताळच्या सुट्टीतही मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे दाखल होत असतात. दरम्यान, नाताळच्या सुट्ट्या सुरू झाल्या असून वर्षाचे शेवटचे दिवस आनंदात घालविण्यासाठी आणि नववर्षाच्या स्वागतासाठी अलिबाग तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यालगत असलेले रिसॉर्ट्स, होमस्टे, फार्महाऊस, कॉटेजेस महिन्याभरापुर्वीच बुक झाले असून अनेक ठिकाणी 'हाऊसफुल्ल'ची स्थिती निर्माण झाली असल्याचे रिसॉर्ट चालक आणि मालक यांच्याकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मध्यंतरी अलिबागमधील नागाव येथे बिबट्या आल्याने व्यावसायिकांची चिंता वाढली होती. नागावसह बाजूच्या परिसरात बिबट्या मुक्तपणे संचार करत होता व वनविभाग बिबट्याला जेरबंद करण्यास अपयशी ठरले. त्यामुळे पर्यटक नागावला येतील का? असा प्रश्न येथील स्थानिक व्यवसायिकांना पडला होता. मात्र, पर्यटकांनी स्थानिक व्यावसायिकांची चिंता दूर केली आहे. नागावसह अलिबाग, आक्षी, किहीम, रेवदंडा या गावांना पर्यटक अधिक पसंती देत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

गेल्या काही वर्षांपासून अलिबागमध्ये बीच कॅम्पिंग हा पर्यटनाचा नवा ट्रेंड सुरू झाला आहे. समुद्रकिनाऱ्यालगत उभारण्यात येणारे छोटे-छोटे तंबू, त्यामध्ये एक किंवा दोन व्यक्तींची राहण्याची सोय, रात्री बॉनफायर, संगीत, विविध खेळ आणि डीजे नाईट यामुळे पर्यटकांना वेगळाच अनुभव मिळतो. एका ठिकाणी साधारण तीस ते चाळीस तंबू उभारलेले असतात आणि त्यामध्ये वेगवेगळ्या भागांतून आलेले पर्यटक एकत्र येऊन आनंद साजरा करतात. हिवाळ्याची थंडी सुरू झाल्यामुळे हा अनुभव अधिकच आनंददायी ठरतो. मात्र, यामुळे सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होत असून स्थानीक प्रशासनाने यावर विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. तसेच, परवानगीशिवाय होणारे कॅम्पिंग, मोठ्या आवाजातील संगीत आणि मद्यपानामुळे होणारा गोंधळ यावर नियंत्रण ठेवणे देखील आवश्यक असल्याचे बोलले जात आहे. तसेच, अलिबाग तालुका हा पर्यटनासह खाद्यप्रेमींसाठीही खास आकर्षण ठरत आहे. हिवाळ्यात अलिबागमधील प्रसिद्ध पोपटीचा आस्वाद घेण्यासाठी हजारो पर्यटक आवर्जून येत असतात. याशिवाय कोळीवाडा पद्धतीचे मासे, भाकरी, सोलकढी यांचा आस्वाद घेण्यासाठीही पर्यटक आवर्जून अलिबागला येत असतात.

दरम्यान, नाताळ आणि वर्षअखेरीच्या सुट्टीच्या काळात अलिबागमध्ये पर्यटकांची संख्या मोठ्याप्रमाणात वाढत असल्याने शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. अलिबाग-मुरुड, अलिबाग-पनवेल त्याचबरोबर अलिबाग-मांडवा मार्गावर फेरीबोटींसाठी जाणाऱ्या वाहनांची मोठी गर्दी होते. तर, शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ परिसर, समुद्रकिनाऱ्यांकडे जाणारे रस्ते आणि पर्यटनस्थळांच्या मार्गांवर दिवसभर वाहनांच्या रांगा लागतात. अरुंद रस्ते, अपुरी पार्किंग व्यवस्था, खासगी वाहनांचा वाढता वापर आणि पर्यटक बसेसची संख्या यामुळे ही कोंडी अधिक तीव्र होते. याचा थेट परिणाम स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत असून कामावर जाणे, रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवांना मार्ग काढणेही कठीण होत आहे. वाहतूक कोंडीमुळे अपघातांचा धोका वाढत असून प्रदूषणातही भर पडत आहे. तसेच, स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि अलिबाग नगरपरिषदेने खबरदारी घेत योग्य नियोजन करण्याची गरज आहे. सुरक्षितता, शिस्त आणि पर्यावरणाचे भान ठेऊन हा पर्यटन हंगाम पार पडावा, असे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. एकूणच नाताळ आणि थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर अलिबाग पर्यटकांनी गजबजून जाणार असल्याचे चित्र दिसत आहे.

दिनविशेष

# अभिनेते, दिग्दर्शक दिलीप कुलकर्णी

एक शिस्तबद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक अशी ओळख असणाऱ्या दिलीप कुलकर्णी यांनी अनेक मराठी नाटकं, चित्रपट व दूरचित्रवाणी मालिकांमधुन चरित्रात्मक भुमिका साकारल्या आहेत. नाटककार सुरेश खरे यांच्या एका घरात होती या नाटकाद्वारे त्यांनी रंगभूमीवर पदार्पण केले. ओली या नाटकात त्यांनी शरीरभाषेचा केलेला वापर हा अभिनेता म्हणून एक आदर्श वस्तुपाठ होता. बखर एका राजाची, अफलातून, घरोघरी ही नाटके व चौकट राजा, आक्रित, रात्र आरंभ या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका लोकप्रिय ठरल्या. २२ डिसेंबर २००२ रोजी दिलीप कुलकर्णी यांचे मुंबईत निधन झाले.



अभिनेते अमोल पालेकर, चित्रा पालेकर यांनी दिलीप यांच्यासमवेत एक नाट्यकंपनी सुरू केली, ज्यात प्रयोगात्मक आणि व्यावसायिक नाटकांची निर्मिती झाली. दिलीप यांनी नंतर मधू रे यांच्या 'आणि म्हणून कोणीही' या मराठी नाटकाचे रूपांतर व दिग्दर्शन केले, ज्याने अनेक पुरस्कार (राज्य पुरस्कार) जिंकून प्रसिद्धी मिळविली. त्यांनी मराठीतील गिरीश कर्नाड यांच्या नागमंडळात दिग्दर्शन आणि अभिनय केला. पंडित सत्यदेव दुबे यांच्या थिएटर युनिट आणि रंगायन (विजया मेहता) या थिएटर कंपनीसाठी त्यांनी नाटकांचे दिग्दर्शन केले. त्यांची काही प्रमुख नाटके - गोची, माझ काय चुकल, साटलोट.

ज्या बँकेत ते काम करत होते, तेथे नाट्यगट तयार केला आणि त्यांनी अभिनय आणि दिग्दर्शन करण्यास सुरवात केली. त्या काळात सहकारी बँकांमध्ये आंतर-बँक एकांकीका स्पर्धा घेतल्या जायच्या, ज्यामध्ये दिलीप यांनी व्यावसायिक जबाबदाऱ्या सांभाळत उत्साहाने सहभाग घेतला.

परिंदा (१९८९), विनाशक - (१९९८) आणि सर्वसाक्षी (१९७८) थोडासा रुमानी हो जाए, मेरे बीवी की शादी अशा हिंदी चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. त्यांची टीव्ही मालिका १००, सिर्फ चार दिन या ८०च्या दशकात हिट होत्या. तेव्हापासून ते प्रेक्षकांसाठी कठोर पोलीस अधिकारी म्हणून ओळखले जात होते. त्यांनी महेश मांजरेकरचा आई, स्मिता तळवलकर यांचा चौकट राजा, अजय फणसेकरांचा रात्र आरंभ अशा अनेक मराठी चित्रपटांत काम केले. झी मराठीवरील नायक, ईटीव्ही मराठीवरील समांतर, दूरदर्शनवरील चाळ नावाची वाचाळ वस्ती हे त्यांचे काही लोकप्रिय टीव्ही कार्यक्रम होते. या कार्यक्रमांना प्रेक्षकांकडून भरघोस पसंती मिळाली. मराठी इंडस्ट्रीत अनेक दर्जेदार काम केली. मराठी चित्रपटसृष्टीत त्यांचे नाव अजूनही घेतले जाते.

लोकसंसद

## आरोग्यदायी तुळस घरी आणा !

नाताळ सण जवळ आल्याने बाजारात ख्रिसमस ट्री आणि सांताक्लॉजचे लाल कपडे मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आले आहेत. हल्ली कॉन्व्हेंट शाळांमध्ये ख्रिस्ती धर्मियांपेक्षा हिंदूंचीच मुले अधिक शिकत असल्याने या मुलांचे कुटुंबीय ख्रिसमस सण सुद्धा दिवाळी दसऱ्याप्रमाणेच साजरा करू लागले आहेत. ख्रिसमसच्या निमित्ताने घरी ख्रिसमस ट्री आणून त्यावर विद्युत रोषणाई आणि सजावट केली जाते; मात्र घरी आणला जाणारा ख्रिसमस ट्री सोबत अनेक आजारांनाही घेऊन येत असल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. संशोधक डॉ. लॉरेन्स कुरलेंडस्की यांच्या मते २५ डिसेंबरच्या दरम्यान उत्सव काळात श्वसनासंबंधी रोगांच्या तक्रारींमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते. याबाबत अधिक संशोधन केले असता यामागे ख्रिसमस ट्री मुख्य कारणीभूत असल्याचे दिसून आले आहे. त्यांनी मांडलेल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे, की ख्रिसमस ट्रीममुळे खोकला, श्वास घेण्यात अडचण, तसेच सुस्ती आणि अनिद्रा यांसारख्या आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात, हा ख्रिसमस ट्री कधी कधी धोकादायक आणि दीर्घकालीन रोगांचे निमित्तही होऊ शकतो. या झाडाला अनेक दिवस घरात ठेवल्यामुळे घरात रोगकारक जिवाणूंची जलदगतीने वृद्धी झाल्याचे लक्षात आले आहे. ज्यामुळे ब्राँकाइटिस आणि न्यूमोनिया यांसारखे गंभीर आजार उदभवू शकतात. लहान मुलांसाठी तर ख्रिसमस ट्री अधिक धोकादायी आहे. सध्याची दूषित हवा आणि वातावरणातील प्रदूषण यामुळे अनेकांना श्वसनाचे विकार जडले आहेत. बदलत्या वातावरणामुळे सर्दी, पडसे, ताप, घसा खवखवणे यांसारखे आजार उद्भवू लागले आहेत. हे आजार लवकर बरेही होत नसल्याचे लक्षात आले आहे, त्यामुळे ख्रिसमसला रोगदायी ख्रिसमस ट्री घरी आणण्यापेक्षा आरोग्यदायी तुळस आणून दारी लावण्याची शिकवण मुलांना द्या. दारात तुळस लावण्याचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक लाभही आहेत. मुलांना ते समजावून सांगा. ज्यांच्या दारी तुळस असते त्या घरातील माणसे खूप कमी आजारी पडतात हे आधुनिक शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## शाळांना 'इंटरनॅशनल' आणि 'ग्लोबल' हे शब्द वापरण्यावर निर्बंध

राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असूनही राज्यातील काही शाळांच्या नावांमध्ये 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई', 'इंग्लिश मिडियम' असे भारदस्त शब्द वापरून पालक व विद्यार्थ्यांची दिशाभूल केली जात असल्याच्या तक्रारी वाढल्याने राज्य शिक्षण संचालनालयाने हे शब्द शाळांच्या नावांमधून तात्काळ वगळण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच शाळांच्या नावात असे शब्द गैररित्या वापरणाऱ्या शाळांवर उचित कारवाई करण्यात येणार आहे. नव्या शाळांना मान्यता देताना त्या संस्थेच्या शाळेचे नाव, त्यांचे शेक्षणिक मंडळ व शिक्षणाचे, भाषेचे माध्यम, संबंधित संस्थेचा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जा इत्यादींचा सर्वंकष सखोल विचार करून मान्यता देण्यात येणार आहे. खरे तर 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' हे शब्द शाळेच्या नावामध्ये वापरण्यासाठी शाळेला आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न असावे लागते तसेच शाळेच्या परदेशात शाखा असाव्या लागतात. पण प्रत्यक्षात त्या शाळांना आंतरराष्ट्रीय दर्जा आणि संलग्नता नसल्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल होऊन फसवणूक होते. त्यामुळे राज्य शासनाने योग्य अटी आणि निकष पूर्ण न केलेल्या शाळांच्या नावांमध्ये 'इंटरनॅशनल' आणि 'ग्लोबल' हे शब्द वापरण्यावर निर्बंध घातले आहेत ते योग्यच आहेत. पालकांनीही खोट्या प्रतिष्ठेपायी कोणतीही शहानिशा न करता शाळेच्या 'इंटरनॅशनल' व 'ग्लोबल' नावामागे हुरळून जाऊ नये जेणे करून फसवणुकीचे पुढील अनर्थ टळतील.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ डिसेंबर

१) श्री प्रभाकर नारायण शिंदे
कुरूळ, अलिबाग, २२-१२-१९३९
२)सुरेश कृष्णा पाटील
अलिबाग, २२-१२-१९६४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**कै. श्री. राजेश बाळकृष्ण म्हात्रे, स्मरणार्थ, अलिबाग**

# विवाहासाठी दिव्यांगांना अडीच लाखांचा लाभ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी, दिव्यांग आत्मनिर्भर बनावा, विवाहापासून दिव्यांग वंचित राहू नये, यासाठी आता दिव्यांगांना विवाहासाठी शासनाकडून अडीच लाख रुपये दिले जाणार आहेत. त्यात पती-पत्नीपैकी एकजण दिव्यांग असल्यास त्यांना दीड लाख रुपये तर दोघेही दिव्यांग असल्यास अडीच लाख रुपये मिळणार आहेत.

दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाकडून दिव्यांग व्यक्तीच्या विवाहाचा सहज स्वीकार, त्यामुळे त्यांना प्राप्त होणारे कौटुंबिक, भावनिक, मानसिक, सामाजिक स्थैर्य विचारात घेऊन दिव्यांगांच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन अनुदान योजना सुरू केली आहे. दिव्यांगांना समाजात स्वतंत्रपणे राहता यावे, त्यांना राहणीमानाचा दर्जा मिळावा, त्यांच्या अधिकारांचे रक्षण व्हावे यासाठी ही योजना आहे. दरम्यान, आता विवाहाचा खर्च वाढल्याने दिव्यांग कल्याण विभागाने अनुदानात वाढ केली आहे. पूर्वी दिव्यांगांना विवाहासाठी ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जात होते; आता त्यात मोठी वाढ करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार, आता पती किंवा पत्नी यापैकी एक दिव्यांग असल्यास त्यांना विवाहासाठी दीड लाख रुपये आणि पती-पत्नी दोघेही दिव्यांग असल्यास त्यांना अडीच लाख रुपये मिळणार आहेत. त्यातील अर्धी रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात पाच वर्षांसाठी फिक्स डिपॉझिट केली जाईल. उर्वरित रक्कम त्यांना लगेचच संसाराच्या कामासाठी वापरता येणार आहे. या लाभासाठी नवविवाहित दिव्यांग लाभार्थीने आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा कार्यालयाकडे अर्ज करावा. त्यानंतर कार्यालयाकडून अर्जाची छाननी करून पात्र लाभार्थींचे प्रस्ताव जिल्हा निवड समितीकडे मान्यतेसाठी पाठविले जातील. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्याधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, समाजकल्याण सहायक आयुक्त व दिव्यांग कल्याण अधिकाऱ्यांची समिती त्या प्रस्तावास मंजुरी देईल. त्यानंतर लाभार्थींच्या खात्यात लाभ जमा होणार आहेत.

### कागदपत्रे अन् अटी काय?

वधू किंवा वराकडे किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे आधार संलग्न वैध वैश्विक ओळखपत्र आवश्यक. दिव्यांग वधू-वरापैकी एकजण महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विवाह कायदेशीररीत्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदलेला असावा. वधू व वराचा पहिलाच विवाह असावा. वधू किंवा वर घटस्फोटित असल्यास अशी मदत यापूर्वी घेतलेली नसावी. विवाहानंतर एक वर्षात योजनेच्या लाभासाठी अर्ज करता येईल. लाभासाठी यूडीआयडी दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, संयुक्त बँक खात्याचे बँक पासबुक, अधिवास प्रमाणपत्र आवश्यक.

# निवडक

## शालेय स्पर्धांचे बक्षीस वितरण



खरोशी : पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळेमध्ये पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी विविध शालेय स्पर्धा तसेच क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन आपली चुणूक दाखवली. या सर्व गुणवंत आणि यशस्वी विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी कार्याध्यक्ष वसंत आठवले, संस्थेच्या संचालिका डॉ. नीता कदम, मुख्याध्यापिका लेखा ठाकूर, शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक वर्षात ज्या शाळा स्तरावर विविध स्पर्धा आणि वार्षिक क्रीडा स्पर्धा झाल्या त्या सर्व सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धंचे बक्षीस वितरण शाळेत करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य बक्षीस म्हणून देण्यात आले. अध्यक्ष वाचनामध्ये वसंत आठवले यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी वर्षभरामध्ये मिळवलेले जे यश आहे ते अतिशय कौतुकास्पद आणि वाखाणण्याजोगे आहे. यापुढेही त्यांनी अशीच भरघोस बक्षीस मिळवून स्वत:बरोबर शाळेचे नाव लौकिक करावे, असे सांगून सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मदत

**मुरुड जंजिरा :** मुरुड तालुक्यामधील शिरगाव प्राथमिक शाळेत सिंगापूर इंटरनॅशनल स्कूलच्या शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांसहित भेट दिली. भारताचे खरे दर्शन खेड्यात घडते, हे या विद्यार्थ्यांना सप्रमाण दाखवून खेड्यातील होतकरू, गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी ही संपूर्ण टीम शाळेत दाखल झाली आहे. पुढील तीन दिवस ही उच्चभ्रू वर्गातील मुले येथे श्रमदानासह कलाविष्कार सादर करणार आहेत. येथील बागकाम, शाळेची संपूर्ण रंगरंगोटी, कलाविष्कार, काही भौतिक सुविधा यासह येथील विशेष गरजा असलेल्या विद्यार्थीनींच्या शिक्षणाची जबाबदारी उचलण्याचे अभिवचन देणाऱ्या या टीमचे तसेच येथील मुख्याध्यापक राजेंद्र नाईक, प्रियंका पाटील यांचे शिरगाव ग्रामस्थांसह मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी भरभरून कौतुक केले.

# उणेगाव शाळेत माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

## ● शाळेच्या देदिप्यमान प्रगतीसाठी ग्रामस्थांचा पुढाकार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगडच्या सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या रायगड जिल्हा परिषद उत्कृष्ट शाळा, उणेगाव येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. अनेक वर्षांनंतर जुन्या मित्रांच्या भेटीने आणि शाळेच्या बदललेल्या हायटेक रूपाने सर्वच माजी विद्यार्थी भावूक झाले होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाळेच्या देदीप्यमान प्रवासाचा आढावा घेण्यात आला. आज ही शाळा केवळ एक इमारत नसून गुणवत्तेचा एक मापदंड बनली आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानातील यश, दक्षिण रायगडमध्ये प्लास्टिक रिसायकल वॉरियर स्पर्धेत मिळवलेला प्रथम क्रमांक, आणि सलग ४ वर्षे शिष्यवृत्ती तसेच ३ वर्षे नवोदय प्रवेशाची परंपरा, मंथन प्रज्ञाशोध परीक्षा यश, विज्ञान प्रदर्शन, विविध सहशालेय उपक्रम यामुळे शाळेने जिल्ह्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. डिजिटल शिक्षण, सौर ऊर्जा (सोलर पॅनल) आणि वॉटर कुलर यांसारख्या आधुनिक सुविधांमुळे शाळा आता पूर्णपणे स्मार्ट झाली आहे.

या मेळाव्यासाठी गोरेगाव बिटाचे विस्तार अधिकारी कुमार खामकर, केंद्र प्रमुख शंकर शिंदे आणि गजानन देवकर उपस्थित होते. त्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या कर्तव्य आणि जबाबदारीवर प्रकाश टाकला. शाळेला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी मुंबईकर आणि ग्रामस्थांची संयुक्त सभा घेऊन विविध प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

शाळेच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी शंकर शिंदे, श्रीपत सत्वे, मंगेश शिंदे आणि वासुदेव सत्वे यांनी आर्थिक योगदान दिले. तसेच, शाळेचे जीर्ण रजिस्टर अद्यायावत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन जेष्ठ मार्गदर्शक शंकर शिंदे आणि विकासदादा सत्वे यांनी दिले.

शाळेच्या भविष्यातील विकासासाठी यावेळी माजी विद्यार्थी संघाची अधिकृत कमिटी स्थापन करण्यात आली. अध्यक्ष शंकर शिंदे, उपाध्यक्ष गजानन देवकर, कोषाध्यक्ष विठोबा सत्वे, सल्लागार-शंकर शिंदे व विकास सत्वे, सदस्य-संजय सत्वे आणि संतोष शिंदे यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी शंकर शिंदे, विकास सत्वे, वासुदेव सत्वे, नारायण चेरफळे, गणपत सत्वे, सचिन सत्वे, स्मरणिका जुमारे, अरविंद सत्वे, श्रीपत सत्वे, भगवान शिंदे, महेश शिंदे, महादेव महाडिक, मंगेश शिंदे, मंगेश सत्वे, निलेश शिंदे, नारायण शिंदे, संजिवनी शिंदे, कविता चेरफळे, इंदू सत्वे, विठोबा सत्वे आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक सुर्यभान शिरसाट, संगीता शिगवण, मुकेश भोस्तेकर आणि अमोल हांगे यांनी विशेष मेहनत घेतली. शाळेच्या भिंतींवरील बोलकी चित्रे आणि शिस्तबद्ध नियोजन पाहून उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे आभार मानले. आपल्या शाळेची ही प्रगती पाहून सर्वच माजी विद्यार्थ्यांची छाती अभिमानाने भरून आली होती.

## दत्तात्रेय पाटील यांचे निधन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रांजणखार येथील दत्तात्रेय गणू पाटील यांचे मंगळवारी (दि.१६) वयाच्या ८८व्या निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भुवनेश्वर येथील वैकुंठ धाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातीलमान्यवर उपस्थित होते.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंड असा खूप मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य शुक्रवारी (दि.२६) सकाळी भुवनेश्वर येथे व होम हवन राहत्या घरी रांजणखार नाका येथे होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबाच्यावतीने सांगण्यात आले आहे.

## लेडीज सॅण्डलमधून एमडीची तस्करी

**ठाणे :** थर्टी फर्स्टच्या धर्तीवर एका ड्रग्ज तस्करीचा डाव उधळून लावत विठ्ठलवाडी पोलिसांना यश आले आहे. त्यांनी ड्रग्ज तस्कर इस्माईल अब्बासी (५५) याला बेड्या ठोकल्या आहे. तसेच, त्याच्याकडून पोलिसांनी सव्वासात लाखांची एमडी पावडर जप्त केली आहे. पोलिसांच्या हातावर तुरी देण्यासाठी हे ड्रग्ज लेडीज सॅण्ड्लच्या टाचेत लपवून ठेवल्यचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, थर्टीफर्स्टच्या पाश्वभूमीवर पोलिसांनी ठिकठिकाणी नाकाबंदी, वाहनांची झडती घेण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, विठ्ठलवाडी पोलीस शुक्रवारी रात्री उशिरा गस्त घालत होते. यावेळी त्यांना व्हीटीसी ग्राऊंडजवळ एक व्यक्ती संशयास्पद फिरताना दिसला. पोलिसांना बघून त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून त्याच्यावर झडप घातली. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्या बॅगमध्ये पोलिसांना लेडीज सॅण्डल सापडले. पोलिसांनी सॅण्डलची हिल तपासली असता त्यात ७ लाख २६ हजारांचे एमडी पावडर मिळाले. इस्माईल अब्बासी असे आरोपीचे नाव असून हा मूळचा इंदोर येथील रहिवासी आहे. त्याने हे एमडी कुठून आणले व तो कोणाला विक्री करण्यासाठी आला होता याचा तपास पोलीस करत आहेत.



## माजी विद्यार्थ्यांकडून गुरूंचा सन्मान

**कोलाड :** रोहा तालुक्यातील राजिप प्राथमिक शाळा ऐनघर हेदवली येथील इयत्ता ५ वी ते ७ वीपर्यंत एकाच वर्गात शिक्षण घेऊन विविध स्तरावर कार्यरत असलेल्या ऐनघर पंचक्रोशीतील माजी विद्यार्थ्यांनी समाजापुढे आगळा वेगळा आदर्श ठेवला आहे. तब्बल ३५ वर्षानंतर सर्व माजी विद्यार्थी एकत्र येऊन शुक्रवारी (दि.१९) सुरेखा म्हात्रे यांची पेझारी-अलिबाग येथे त्यांच्या राहत्या निवासस्थानी जाऊन त्यांना सदिच्छा भेट दिली. त्यांना पुष्पगुच्छ व आठवणीतील भेट वस्तू देऊन त्यांचा सन्मान केला.

# मढाळी बु. येथे एनएसएस शिबीर

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील राजिप शाळा मढाळी बु. येथे एनएसएस युनिट ऑफ वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड बिझनेस मॅनेजमेंट कॉलेजच्या एनएसएस कॅम्पला १८ डिसेंबरपासून सुरुवात झाली आहे. हे शिबीर २४ डिसेंबरपर्यंत मढाळी बुद्रुक या गाव व परिसरामध्ये सुरू राहणार आहे.



शहरी भागातील विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील क्षेत्राचा अनुभव तसेच आदिवासी भागातील लोकांचे राहणीमान तेथील समस्या त्यावर आपल्याकडून सहकार्य काय करता येईल, यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्याकरिता कॉलेजच्या मुख्याध्यापिका डॉ. निथ्या वर्घसे यांनी या आदिवासी बहुल भागातील हे गाव निवडले असल्याचे सांगण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात पहिले परिसरामधील स्वच्छता करून करण्यात आले. या शिबिराची सुरूवात कार्यक्रम अधिकारी: सहाय्यक प्राध्यापक निशा बरकाथु आणि प्राध्यापक अभिषेक गुरव यांच्या नियोजनाने झाली.

# फॅन्सी ड्रेस स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। उरण । प्रतिनिधी ।**

बी.एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नुकतीच चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी रंगतदार फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नर्सरी, ज्युनिअर केजी आणि सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. नर्सरीतील विद्यार्थी फळांच्या वेशात, ज्युनिअर केजीतील विद्यार्थी प्राण्यांच्या वेशात, तर सीनियर केजीतील विद्यार्थी फुलांच्या वेशात सजले होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास पाटील यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. या स्पर्धेत नर्सरीमधील प्रिंसिका कोळी, रिदान कासकर, प्रिन्स नवले, अश्वा नवाले, अनन्य पाटील, शर्व शेलके, आयान पाटील, सार्थ घरत, आर्य माळी; ज्युनिअर केजीमधील क्रियांश नवाले, क्रिशा ठाकूर, समप्रिती पाटील, श्रीजा जोशी, मायरा चिट्टमपल्ले, मितांश पाटील, शौर्य पाटील, शौनक पाटील, प्रिन्स गडरी, गोविंद भाटी, प्रिशा ताम्राकर, आराध्य थळी; तसेच, सीनियर केजीमधील मोक्षा जोशी, सायरा घरत, हर्षिता जैसवाल, दुर्गा भाटी, वर्षा देवाशी यांनी आपल्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली.

## खारगल्ली येथे नेत्र शिबिराचे आयोजन

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव-खारगल्ली येथील धोबनतळ्या समोरील प्रशांती निवास येथे मंगळवारी (दि.२३) विनामुल्य नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मागील महिन्यात श्री सत्यसाई बाबांच्या जन्म शताब्दी निमित्त श्री सत्य साई सेवक सुरेश मेहेर यांच्या प्रशांत निवासमध्ये शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते श्री साई नेत्रालय या ओ. पि.डी. युनिटचे उद्घाटन करण्यात आले होते. या ओपिडी युनिटद्वारे मंगळवारी नेत्र संबधीत सर्व उपचार, तसेच मोती बिंदू/काच बिंदूचे मोफत ऑपरेशन करण्यात येणार असल्याचे आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड झेरॉक्स प्रत आवश्यक असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

संस्कृतीसह सेवाभावाचा अद्भुत महोत्सव | अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार

# ‘ग्लोबल मैत्री फेस्टिव्हल’चे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

‘ग्लोबल मैत्री फेस्टिव्हल’ हा वर्षातील सर्वात प्रतीक्षित कार्यक्रमांपैकी एक असून तो शनिवारी (दि.२७) मुंबई येथील पोलीस परेड ग्राउंडवर आयोजित करण्यात येणार आहे. १२ हजारहून अधिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत होणारा हा भव्य महोत्सव मैत्रीबोध परिवाराच्यावतीने आयोजित केला जात असून भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाचे त्याला पूर्ण समर्थन लाभले आहे. हा या महोत्सवाचा सातवा वार्षिक सोहळा असून, यात भारताची समृद्ध संस्कृती तसेच मैत्रीभाव आणि सेवाभाव यांसारख्या मूलभूत मूल्यांचे भव्य दर्शन घडते.

भारताचा गौरव सजीव स्वरूपात अनुभवण्याचे हे सर्वांसाठी खुले आमंत्रण आहे. या वर्षीच्या महोत्सवात अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. त्यामध्ये केंद्रीय कायदा व न्याय मंत्री अर्जुन मेघवाल, केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रतापराव जाधव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक विशिष्ट पाहुण्यांचा समावेश आहे. तसेच, ज्येष्ठ व लोकप्रिय कलाकार जॅकी श्रॉफ, स्मिता जयकर आणि काजल अग्रवाल हेही या सोहळ्याची शोभा वाढवणार आहेत.




यावर्षी महोत्सवाला सांस्कृतिक भागीदार म्हणून मैत्री कल्चरल इकॉनॉमी समिटचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्या सहभागातून, विशेष सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे भारताची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक ओळख आणि समृद्ध वारसा प्रभावीपणे सादर केला जाणार आहे. दरवर्षी हा महोत्सव भारताच्या समावेशक भावनेचे आणि ‘वसुधैव कुटुंबकम’ या शाश्वत संदेशाचे प्रतिबिंब असतो. या उत्सवाला मैत्रेय दादाश्रीजी यांची पावन उपस्थिती व मार्गदर्शन लाभते. ते या महोत्सवाचे दूरदर्शी असून मैत्रीबोध परिवाराचे संस्थापक आहेत. एक समाजसुधारक आणि जागतिक मानवतावादी म्हणून ते जगभरातील लोकांना प्रेम आणि नि:स्वार्थ सेवेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. २०२५ चा महोत्सव ‘एक भारत हम भारत’ या संकल्पनेवर आधारित असून, सामूहिक जाणीवेच्या या निर्णायक काळात एकता आणि सामायिक ओळखीवर भर देतो. हा संदेश नागरिकांना सर्व भेद विसरून आपण एकाच कुटुंबाचे घटक आहोत, याची जाणीव करून देतो.

यावर्षी महोत्सवात चार परिवर्तनकारी उपक्रम सादर करण्यात येणार आहेत, जे दीर्घकालीन सामाजिक परिवर्तनासाठी कार्यरत आहेत. ग्रामीण विकासासाठी ‘मैत्री आदर्श ग्राम’, मानसिक व भावनिक कल्याणासाठी राष्ट्रीय उपक्रम ‘चिंतामुक्त भारत २०३२’ युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी ‘युवा परिवर्तन’ आणि अखिल विश्व गायत्री परिवाराच्या सहकार्याने आयोजित ‘विश्व शांती महायज्ञ’, जो जागतिक शांतता आणि सद्भावासाठी समर्पित आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे मैत्रेय दादाश्रीजी यांचे वार्षिक संबोधन, ज्यामध्ये ते मानसिक आरोग्याशी संबंधित आव्हानांवर मात करण्यासाठी तसेच येणाऱ्या वर्षाकडे स्पष्टता आणि अंतर्गत सामर्थ्यासह वाटचाल करण्यासाठी सखोल मार्गदर्शन व प्रेरणा देतील. तसेच, ग्लोबल मैत्री फेस्टिव्हल २०२५ जीवनाच्या विविध क्षेत्रांतील सर्व लोकांना या सामूहिक उत्सवात सहभागी होण्याचे आमंत्रण देत असतो.

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बागायत जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणाऱ्या घर मिळकती, अशी संपूर्ण मिळकत श्री. अविनाश शांताराम राऊळ व सौ. प्रतिमा अविनाश राऊळ, रा. मुलुंड-मुंबई, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार, सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. अविनाश शांताराम राऊळ व सौ. प्रतिभ अविनाश राऊळ, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, रस्त्याची वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकती पुर्णतः निर्वेध आहेत, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग | २१४/१ | ००-१७-३० <br> ००-०२-९० (पो.ख.) <br> ००-२०-२० एकूण | ०७-९३ |

सदर बागायत जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडील घर क्रं. २५१२ व घर क्रं. २८९३ ह्या घर मिळकती.

सदर मिळकतीस चतुःसिमा
पुर्वेस : गट नं. २१४/२ ही बागायत जमिन मिळकत.
पश्चिमेस : सार्वजनिक रस्ता.
दक्षिणेस : गट नं. २३४ ही जमिन मिळकत.
उत्तरेस : गट नं. २१० ही जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २१/१२/२०२५

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, फ्लॅट नं. २,
अे विंग, तळमजला टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. शुभांगी लक्ष्मण शेणॉय यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे बार्णे, ता. कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २४/७ एकुण ०.३०.४० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २२/१२/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक विक्रांत विरेन्द्रकुमार अग्रवाल व कैवल्या विरेन्द्रकुमार अग्रवाल यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड | ६/१/अ | ०.२३.७० | ०.७२ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २१/१२/२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवली ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९०४९४८६८०५

# निवडक

## नागोठण्यातील उर्दू हायस्कुलच्या स्नेहसंमेलनाचे आयोजन

**नागोठणे :** एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कुल आणि ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन मंगळवारी (दि.२३) रात्री ८ वाजता हायस्कूलच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. या वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अतिशय आनंदी व उत्साही वातावरण पसरले असून या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थी वर्गाकडून गुणदर्शनीय व मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले जाणार असल्याची माहिती नागोठणे एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव लियाकत कडवेकर यांनी दिली आहे. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन भारतीय एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रशाद मुजावर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गिता पालरेचा, को.ए.सो.गु.रा. अग्रवाल विद्यामंदिरचे अध्यक्ष नरेंद्र जैन, मैमुना हसनमिया नालखंडे चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष नाजीम नालखंडे, फजनदार एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष अब्दुररहमान फजनदार आदी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.



## मुरूडकरांना शेकोटीचा आधार

**मुरूड :** गेल्या आठवड्या भरापासून मुरुडमध्ये थंडीचा जोर कायम राहिला आहे. या आठवड्यातील शनिवारी (दि.२०) पाहाटे मात्र थंडीने रेकॉर्ड ब्रेक केला आहे. यावेळी पारा चक्क पारा १३ अंश सेल्सीयसपर्यंत उतरला होता. बाहेर पडलेल्या दवामध्ये अकरा अंशापर्यंत तापमान घसरल्याचे सांगण्यात येत आहे. या रेकॉर्ड ब्रेक थंडीमुळे मुरूडच्या ग्रामस्थांनी शेकोटीचा आधार घ्यावा लागला. त्यातच शनिवारी सुट्टी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटक मुरूडमध्ये दाखल झाले आहेत. त्यांना देखील शेकोटीसह गरम कपड्यांचा आधार घ्यावा लागला. पाऊस लांबल्यामुळे अद्याप जमिनी ओल्या असल्यामुळेच मुरूडचा पारा घसरल्याचे जाणाकारांकडून बोलले जात आहे. मुरूडचा पारा आणखी उतरल्यास स्थानिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागेल, अशी भिती व्यक्त होत आहे.



## सर्पमित्राची धाडसी कामगिरी

**पनवेल :** खांदा वसाहत प्रभाग १ मध्ये रविवारी (दि.२१) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास धामण जातीचा साप येथील इमारतीच्या मागच्या बाजूला पहिल्या मजल्यावर सांडपाणी पाईपच्या बाजूने आतमध्ये शिरत असल्याचे महिला वर्गाच्या निदर्शनास आले. हा धामण जातीचा साप पाहताच येथील नागरिक, विशेषतः महिला व लहान मुले भयभीत झाली होती. या घटनेची माहिती सर्पमित्र सिद्धेश गायकवाड यांना देण्यात आली. घटनास्थळी दाखल होत त्यांनी परिस्थितीचा अंदाज घेत अनुभव व कौशल्याच्या जोरावर पहिल्या मजल्यावर चढून अत्यंत धाडसाने धामण जातीच्या सर्पाला सुरक्षितरीत्या पकडले. हा सर्प पकडल्यानंतर तो निसर्गाच्या अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात येणार असल्याची माहिती सिद्धेश गायकवाड यांनी दिली. सर्पमित्राच्या तत्परतेमुळे संभाव्य धोका टळला असून सोसायटीतील नागरिकांनी, विशेषतः महिलांनी सुटकेचा श्वास घेतला.



## मविआचा विजय नवचैतन्य देणारा

**चिरनेर :** उरण नगरपालिकेत नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भावना घाणेकरांचा विजय महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना नवचैतन्य देणारा आहे. ज्यावेळी महाविकास आघाडीत नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराबाबत प्राथमिक चर्चा सुरू होती, तेव्हाच मी माजी आमदार मनोहर भोईर यांना सांगितले की, भावना घाणेकर टक्कर देणाऱ्या आणि जिंकणाऱ्या उमेदवार आहेत. त्या राजकारणात सक्रिय आहेत, त्या लढाऊ आहेत. त्यामुळे भावना घाणेकरच उमेदवार हव्यात, या निर्णयावर मी ठाम राहिलो. आज तो निर्णय भावना घाणेकरांच्या विजयाने सार्थ ठरला, याचा मला मनस्वी आनंद आहे. त्यामुळे भावना घाणेकर यांचा दणदणीत विजय झाला आहे. त्यासाठी उरणच्या महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी खूप मेहनत घेतली. खासदार बाळ्या मामा, अमोल कोल्हे, सुषमा अंधारे यांसारख्या नेत्यांनी प्रचाराच्या अंतिम टप्प्यात महत्त्वाची भूमिका निभावली. त्यामुळे उरणमध्ये महाविकास आघाडीला उत्तम यश मिळाले, असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले. यावेळी त्यांनी खासदार बाळ्या मामा यांच्याशी संपर्क साधून महाविकास आघाडीच्या विजयाबद्दल अभिनंदन केले.

## मराठी भाषेचे संवर्धन महत्वाचे

**खोपोली :** मराठी भाषेचे स्थान उच्च शिखरावर असून तिचे संवर्धन करताना समाजहित आणि समाजाचा एकोपा अबाधित राखणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ प्रवचनकार सुरेश कदम यांनी केले आहे. कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघ यांच्या कोयना जननी दिनदर्शिका २०२६चे अनावरण आणि निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. स्वहस्ते निबंध स्पर्धा ही दोन गटांत आयोजित करण्यात आली होती. पहिल्या गटात विरेन कदम, समृद्धी शिंदे आणि अर्णव नरेंद्र साळुंखे यांनी यश संपादन केले. तर, दुसऱ्या गटात समृद्धी मोरे, प्रकाश साळुंखे, सायली कदम, किरण साळुंखे आणि संदेश साळुंखेयांनी यश संपादन केले असून या सर्व विजेत्यांना प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देण्यात आले. तसेच, इतर भाग घेतलेल्या ५१ स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमादरम्यान, दिनदर्शिकेला सहाय्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# माहिती अधिकाराचे खच्चीकरण थांबवा

■ सजग नागरिक मंचाची मागणी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

माहिती अधिकार कायदा हा लोकशाहीचा कणा आहे. शासनाच्या कारभारात पारदर्शकता, जबाबदारी आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी हा कायदा अस्तित्वात आला आहे. मात्र, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातच जर माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीला तांत्रिक, प्रशासकीय आणि मानसिक अडथळे निर्माण होत असतील, तर ती बाब अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे माहिती अधिकाराचे खच्चीकरण थांबवा, अशी मागणी नवी मुंबईच्या सजग नागरिक मंचाने केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून विविध कार्यकर्ते व नागरिक राज्याच्या ऑनलाईन आरटीआय पोर्टलवर माहिती अधिकारांतर्गत अपील दाखल करण्याचा प्रयत्न करत आहेत. अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रत्यक्ष व्यवहार करताना सतत 'सर्व्हर एरर' येत असून अपील दाखल करणे अशक्य होत आहे. याबाबत यापूर्वीही तक्रारी करण्यात आल्या आहेत; मात्र, अद्याप कोणतीही ठोस सुधारणा झालेली नाही. शनिवारी (दि.२०) देखील हीच समस्या कायम होती. तसेच, या पोर्टलवरील हेल्पलाईन क्रमांक केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित असून तेथे संपर्क साधूनही कोणतीही प्रभावी मदत मिळत नाही. परिणामी, माहिती अधिकाराचा वापर करण्याचा नागरिकांचा घटनात्मक हक्कच प्रत्यक्षात कुचकामी ठरत आहे.

याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे, अलीकडच्या काळात अनेक सरकारी कार्यालयांमध्ये माहिती देण्याऐवजी ती नाकारण्याची प्रवृत्ती वाढताना दिसत आहे. वेळेत उत्तर न देणे, अपुरी माहिती देणे, अपील व सुनावणी प्रक्रियेत अडथळे निर्माण करणे हे प्रकार सर्रास होत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर, माहिती अधिकाराच्या खच्चीकरणास शासनाचा अप्रत्यक्ष पाठिंबा आहे की काय, अशी शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे राज्य सरकारने केवळ 'डिजिटल महाराष्ट्र'च्या घोषणा न करता त्या प्रत्यक्षात उतरवणे गरजेचे आहे. त्यासाठी पुढील सुधारणा तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी सर्व आरटीआय कार्यकर्ते व जागरूक नागरिक मंचाद्वारे करण्यात आली आहे. माहिती अधिकाराचे खच्चीकरण म्हणजे केवळ एका कायद्याचे दुर्बल होणे नव्हे, तर लोकशाही मूल्यांवर घाला घालणे आहे. शासनाने या गंभीर प्रश्नाची तात्काळ दखल घेऊन प्रणाली मजबूत केली नाही, तर नागरिकांचा शासन व्यवस्थेवरील विश्वास ढासळल्याशिवाय राहणार नाही, असे देखील मंचाद्वारे बोलले जात आहे.

### टाळाटाळ करणाऱ्यांवर कारवाई करा

राज्याच्या ऑनलाईन पोर्टलवरील सर्व तांत्रिक त्रुटी तातडीने दूर कराव्यात. अपील व अर्जांसाठीची आर्थिक व्यवहार प्रक्रिया सुकर, स्थिर व विश्वासार्ह करावी. माहिती अधिकार कायदा अधिक प्रभावी होण्यासाठी सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, महामंडळांना माहिती अधिकार कायद्याअंतर्गत अर्ज करणे, अपील करणे व त्याला उत्तर देणे पूर्णतः ऑनलाईन करावे, जेणेकरून प्रशासन अधिकाधिक उत्तरदायी होईल. ऑनलाईन दाखल झालेल्या अर्जांना व अपीलांना ऑनलाईन पद्धतीनेच उत्तर देणे बंधनकारक करावे. हेल्पलाईन प्रणाली प्रभावी, उत्तरदायी व कार्यक्षम करावी. माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कार्यालयांवर कठोर कारवाई करावी, इत्यादी मागण्या नवी मुंबई सजग नागरिक मंचाद्वारे करण्यात आली.

# राजनाला कालव्यातील अपूर्ण काम पूर्ण करा

### कर्जतमधील शेतकऱ्यांची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ४० गावांमधील जमीन ओलिताखाली आणणाऱ्या राजनाला कालव्यातील उजव्या कालव्याची दुरूस्ती तत्काळ पूर्ण करावी, अशी मागणी येथील शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.



कर्जत तालुक्यातील राजनाला कालवा हा तीन भागात विभागला असून उजवा कालवा हा कराळेवाडी, मांडवणे आणि हेदवली सावळा या भागातील शेतीसाठी आहे. परंतु, या विभागात संपूर्ण कालव्याचे पाणी सोडले जात नाही. तसेच, या उजव्या कालव्याचे काम देखील अपुर्णावस्थेत ठेवण्यात आले आहे. त्याचवेळी या कालव्याचे रूंदीकरण कमी केल्याने पाणी कमी प्रमाणात पुढे जात आहे. त्यातच हेदवली येथील मार्गातील आणि मांडवणे येथील चाफेची नाल्याची मोरी फुटलेली आहे. ठेकेदाराने या फुटलेल्या मोरीवर सिमेंटची पिशवी टाकून त्यावर सिमेंट वरचेवर लावलेले आहे. तसेच, मार्गाच्या मोरीपासून जेथे नाला संपतो तेथपर्यंत तिथपर्यंत नाल्याचे काम अपूर्ण आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे गेले अनेक वर्षे येथील शेतकरी या कालव्याचे काम पूर्ण करण्याची, फुटलेल्या मोऱ्या दुरूस्तीची व शेतीसाठी पुर्ण क्षमतेने पाणी सोडण्यावची मागणी करीत आहेत.

> ज्या ठिकाणी कालव्याचे पाणी वाहून नेणाऱ्या मोऱ्या फुटल्या आहेत त्या ठिकाणच्या मोऱ्या दुरूस्त कराव्यात. तसेच, आपल्या शेतामध्ये पाणी जाण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे त्याठिकाणी नव्याने मोरी टाकावी. त्याचबरोबर कालव्याचे काम लवकर पूर्ण करून पाणी पुर्ण क्षमतेने सोडा. आम्हाला पाणी पुढच्या वर्षी मिळाले तरी चालेल मात्र, काम पूर्ण करूनच पाणी सोडावे.
>
> – हरिश्चंद्र म्हसकर, स्थानिक शेतकरी

# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल गजबजणार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील फार्म हाऊस गजबजताना दिसणार असल्याने अनेक फार्महाऊसमध्ये सर्व शासकीय नियमांचे पालन करीत जय्यत तयारी सुरु असल्याचे चित्र आहे.

यंदाच्या वर्षी ३१ डिसेंबर रोजी बुधवार आल्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणावर पनवेल परिसरात दाखल होणार असल्याचे बोलले जात आहे. यावर्षी पाऊस लांबल्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला असून वालाच्या शेंगाचा बहर उशिराने येणार आहे. त्यामुळे पोपटीची चव फार थोड्या प्रमाणावर चाखता येणार आहे. तसेच, गावठी कोंबड्यांची मागणी देखील मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे कोंबडीची किंमत ४०० ते ५०० रुपये आणि कोंबड्याची किंमत ८०० रुपये आणि त्यापुढे आहे. त्याचबरोबर पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फार्महाऊस आहेत. दरवर्षी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात या फार्महाऊसवर पर्यटकांची गर्दी होत असते. त्यामुळे यंदाही मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणेसह इतर जिल्ह्यांतील पर्यटकांनी पनवेल परिसरातील फार्महाऊसमध्ये नवीन वर्षाचे स्वागत करण्याची योजना आखली असून त्यातील बहूतांश पर्यटकांनी आगाऊ बुकींग केलेली आहे. त्यामुळे पनवेलमधील फार्महाऊस आता हाऊसफुल्ल झाले आहेत. त्यामुळे पर्यटकांच्या स्वागतासाठी पनवेलमधील फार्महाऊस मालक-चालक सज्ज झाले आहेत.



# शालेय कराओके स्पर्धा संपन्न

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लायन्स पनवेल सरगम तर्फे आंतर शालेय कराओके गायन स्पर्धा नुकत्याच बांठिया हायस्कूलच्या सभागृहामध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धा इयत्ता ४थी पर्यंत, इयत्ता ५वी ते ७वी आणि इयत्ता ८वी ते १०वी या ३ गटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. या आंतर शालेय कराओके स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेतील ३ वर्षाची सर्वात लहान स्पर्धक रूही राऊत ही या स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरली. विजेत्यांना प्रमुख अतिथी नमिता मिश्रा यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच, या स्पर्धेतील विजेत्यांना 'सरगम कराओके लिट्ल स्टार' हे आकर्षक चषक आणि रोख पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेत पहिल्या गटात प्रथम क्रमांक कैवल्य लोंढे, द्वितीय क्रमांक प्रेम पाटील, तृतीय क्रमांक प्रांजल ठाकूर व उत्तेजनार्थ क्रमांक शौर्य सोनावणे यांनी पटकावला. तसेच, दुसऱ्या गटात प्रथम क्रमांक रोहित कुमार, द्वितीय क्रमांक मार्वी ठाकूर, तृतीय क्रमांक ओंकार शिंपी व उत्तेजनार्थ क्रमांक युक्ता भोईर यांनी पटाकवला. तर, तिसऱ्या गटात प्रथम क्रमांक स्वर म्हात्रे आणि श्रीमती मेहता यांना विभागून देण्यात आला असून द्वितीय क्रमांक तनिषा चव्हाण, तृतीय क्रमांक रियांक जाधव व उत्तेजनार्थ देवश्री घोडके यांनी यश संपादन केले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून विजय मनोहर आणि सुनील काशीद यांनी काम पाहिले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सरगम क्लबचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा यांना संजय गोडसे, अल्केश शहा, स्वाती गोडसे, आदित्य दोशी, ओंकार खेडकर, मानदा पंडित, संध्या महानुभाव, अश्विनी खेडकर तसेच मयुर हाय फायचे मयुर ठक्कर, बांठिया हायस्कूलचे सर्व शिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# शारदा थिटे यांचे निधन

**। खांब । प्रतिनिधी ।**



रोहा तालुक्यातील बाहे येथील शारदा थिटे (७०) यांचे मंगळवारी (दि.१६) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी गुरूवारी (दि.२५), तर अंतिम धार्मिकविधी रविवारी (दि.२८) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली.

# सार्वजनिक बागेतील खेळणी काढण्याची मागणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १९मधील अंतिम भूमापन क्रमांक ६३९ सार्वजनिक गार्डनमुळे आर्टिकल २१ अंतर्गत हक्कांचे उल्लंघन होत असल्याने तेथील खेळणी काढून टाकण्याची मागणी अर्केश कुलकर्णी यांनी महापालिकेकडे केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांना दिले आहे.

या निवेदनात अर्केश कुलकर्णी यांनी म्हटले की, मी पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १९ अंतर्गत येणाऱ्या भागातील रहिवासी आहे. आमच्या सोसायटीसमोर महानगरपालिकेची सार्वजनिक बाग आहे. या परिसरात ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. अलिकडेच या बागेत लहान मुलांसाठी खेळणी बसवण्यात आली आहेत, त्यामुळे या ठिकाणी काही समस्या निर्माण झाल्या आहेत. या बागेत सकाळपासून रात्री ११ वाजेपर्यंत प्रचंड आवाज, आरडाओरडा व घाणेरडे शब्दप्रयोग सुरू असतात. आजूबाजूच्या झोपडपट्टी आणि शेजारच्या चार सोसायट्यांमधील मुले कोणत्याही नियंत्रणाविना येथे येतात. त्याच कारणामुळे पूर्वी या बागेतील खेळणी काढण्यात आली होती. तसेच, या ठिकाणी सायकल आणि दुचाकी चोरीचे प्रकार देखील घडलेले आहेत. सध्या ही बाग २४ तास खुली असून याठिकाणी कोणतेही सुरक्षा रक्षक किंवा देखरेख नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना शांततेत बसण्यास किंवा फिरण्यासही जागा उरलेली नाही. त्यामुळे या बागेतीली सर्व खेळणी तात्काळ काढून टाकण्यात यावीत. सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष कारवाई न झाल्यास आम्ही लोकआयुक्त, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि माननीय न्यायालयात दाद मागू. त्यामुळे होणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांसाठी पनवेल महानगरपालिका व संबंधित वॉर्ड अधिकारी जबाबदार राहतील, असा इशारा अर्केश कुलकर्णी यांनी या निवेदनातून दिला आहे.

# माथेरानची रिक्षावाली बनली नगरसेविका

**। माथेरान । प्रतिनिधी ।**



प्रवाशांना ई-रिक्षातून वाहतुकीची सेवा देत असताना येथील जनतेची सेवा करण्यासाठी श्रमिक रिक्षा संघटनेच्या सदस्या अनिता रांजाणे यांनी नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत यश मिळविले आहे. त्यांनी माथेरान नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सहभाग घेऊन प्रभाग क्र.७ मधून अनुसूचित जमाती करिता उमेदवारी जाहीर करून आपल्या कर्तृत्वावर या विजय संपादन केला आहे.

अनिता रांजणे या ई-रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाला आधार देत होत्या. त्यांनी माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि त्यांनी केलेल्या सर्वतोपरी सहकार्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून अनिता रांजाणे निवडणुकीला सामोऱ्या गेल्या होत्या. त्यांनी हा विजय अत्यंत अटीतटीच्या लढतीत मिळवला आहे. प्रभाग क्र.७ हा खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी काँग्रेसाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. हा अभेद्य बालेकिल्ला शाबूत राखण्यासाठी या भागातील मतदारांनी केलेल्या अनमोल सहकार्यामुळे यशाचे शिखर गाठता आले असल्याचे नवनिर्वाचित नगरसेविका अनिता रांजाणे यांनी सांगितले.

### स्थानिक पातळीवर पाणीप्रश्‍न मिटवला | लोकसहभागातून बांधला वनराई बंधारा

# बेलघर ग्रामस्थांचा सर्वांसमोर आदर्श

**। तळा । प्रतिनिधी ।**

**पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन आहे. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान आणि अनियंत्रित पाणीवापर यांमुळे आज अनेक भागांत पाण्याची तीव्र टंचाई जाणवते. या समस्येवर प्रभावी व पर्यावरणपूरक उपाय म्हणून वनराई बंधारा ही संकल्पना महत्त्वाची ठरते. याच अनुषंगाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द येथील बेलघर ग्रामस्थांनी लोकसहभागातून वनराई बंधारा बांधला आहे.**



वनराई बंधारा म्हणजे नदी, ओढा किंवा नाल्यावर कमी खर्चात उभारला जाणारा लघु बंधारा होय. हा बंधारा प्रामुख्याने माती, दगड, वाळू, सिमेंटच्या गोण्या किंवा स्थानिक उपलब्ध साहित्य वापरून तयार केला जातो. लोकसहभागातून उभारले जाणारे हे बंधारे आहेत. या वनराई बंधाऱ्यांचे अनेक फायदे आहेत. प्रथम, भूजलपातळी वाढते. त्यामुळे विहिरी, बोअरवेल आणि हातपंपांना वर्षभर पाणी मिळते. दुसरे म्हणजे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढते, परिणामी पीक उत्पादनात सुधारणा होते. तिसरे म्हणजे मृदाक्षय (माती धूप) कमी होतो आणि परिसरातील हरित आवरण वाढते. आणि चौथा फायदा म्हणजे दुष्काळी परिस्थितीत गावांना दिलासा मिळतो.

या बंधाऱ्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लोकसहभाग. गावकरी एकत्र येऊन श्रमदान करतात, नियोजन करतात आणि बंधाऱ्याची देखभालही करतात. त्यामुळे सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण होते.वनराई बंधारा हा कमी खर्चाचा, टिकाऊ आणि पर्यावरणस्नेही उपाय असून तो स्थानिक पातळीवर पाणीप्रश्न सोडविण्यास प्रभावी ठरतो. याप्रसंगी सरपंच प्रवीण अंबारले, सदस्य अजय सावंत यांसह बेलघर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कौटुंबिक वादातून दुंदरेकर कुटूंबियांना धमकी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कौटुंबिक वादातून पत्रकार विजय दुंदरेकर व त्यांच्या कुटूंबियांना जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. याबाबतची माहिती दुंदरेकर यांनी रविवारी (दि.२१) घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली आहे. तसेच, या संदर्भात खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे देखील त्यांच्याकडून सांगण्यात आले.

या पत्रकार परिषदेत विजय दुंदरेकर यांनी सांगितले की, त्यांच्या कुटुंबामध्ये दुःखद घटना घडली. यावेळी उत्तरकार्य कधी करायचे याबाबत त्यांच्या कुटुंबीयांची चर्चा होत असताना त्यांच्यात वादविवाद झाले. त्यावेळी त्यांच्या कुटुंबियातील आदित्य दुंदरेकर याने शिवीगाळ करून विजय दुंदरेकर यांचा मुलगा विनय दुंदरेकर यांना मारण्यासाठी धावला आणि बाजूलाच पडलेला लाकडी दंडका उचलून त्यांच्या डोक्यात मारला. त्यात विनय गंभीर जखमी झाला. त्यावेळी सचिन पाटील व किशोर भगत हे सुद्धा आदित्यच्या मदतीला उभे राहिले. त्यांनी देखील विजय दुंदरेकर व कुटुंबियांना धमकावून तुमचा कार्यक्रम लवकरच करतो, अशी धमकी दिली. तसेच, अनंत दुंदरेकर यांनी सुद्धा विजय दुंदरेकर यांच्या पाठीवर लाकडी बॅटने मारहाण केली. या संदर्भात विजय दुंदरेकर व कुटुंबियांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. परंतु, या तक्रारीची योग्य ती दखल पोलिसांकडून घेतली जात नसल्याचे दुंदरेकर कुटुंबियांचे म्हणणे आहे. तरी याबाबत या चौघांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# २२ डिसेंबरचा मोर्चा स्थगित

**नवीन पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लागावे यासाठी काढण्यात येणारा २२ डिसेंबरचा मोर्चा स्थगित करण्यात आलू असल्याची माहिती २७ गाव प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील यांनी दिली आहे.

२५ डिसेंबर रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमान उड्डाण होणार आहे. मात्र अद्यापही या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव दिलेले नाही. त्यामुळे भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, शेतकरी, दिबाप्रेमी नाराज आहेत. नवी मुंबईतून विमान उड्डाण होण्यापूर्वी २२ डिसेंबर रोजी विराट मोर्चा काढण्यात येणार होता. या मोर्चाची तयारी देखील झाली होती. २७ गाव प्रकल्पग्रस्त समितीच्या माध्यमातून पनवेलमधील हजारो नागरिक यात सहभागी होणार होते. खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्या माध्यमातून या आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र आचारसंहितेमुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली आहे. यापुढे आचारसंहिता संपल्यानंतर विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लागावे यासाठी मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती नंदराज मुंगाजी यांनी दिली.

# पोलिसांकडे ब्रेथ ॲनलायझर यंत्रणा गरजेची

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरात एका थार गाडीच्या चालकाने दुचाकीस्वाराला ठोकल्यामुळे झालेल्या गंभीर अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. थार गाडीचा चालक हा अल्पवयीन असल्याचेही सिद्ध झाले आहे. अलिकडे ड्रिंक ॲन्ड ड्राईव्हच्या अनेक घटना ठिकठिकाणी घडत असतात. अशा घटनांपूर्वी पोलीस यंत्रणेकडून वाहनचालकांची ब्रेथ ॲनलायझरद्वारे तपासणी झाल्यास अपघातांना आळा बसू शकेल.

काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथेही रात्रीचे वेळेस पर्यटकांपैकी गाडीच्या एका चालकाकडून एका महिलेचा प्राण गेल्याची घटना घडली होती. त्यावेळीही चालकाची ब्रेथ ॲनलायझ द्वारे तपासणी झाली होती किंवा कसे हे समजले नाही. वाहनचालक अल्पवयीन आहेत किंवा चालकाने वाहन चालविताना मद्यप्राशन केले आहे याचीही नियमित तपासणी होणे गरजेचे झाले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . वेटर, रिसेप्शनिस्ट, किचन मोरी, हाऊसकिपींग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲपवर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- कॅन्टीनमध्ये अनुभवी चायनीज कूक, कूक साऊथ इंडियन, समोसा, वडा, भजी, फडकावाला, सुपरवायझर, मोरीवाला पाहिजे. अलिबाग कंपनी येथे मो. ८८५०७२३३७७
- अलिबाग मधील सुपरमार्केटमध्ये कामासाठी मुली/बाई पाहिजे. ९३२२८२३४०४
- नारळ किंवा गोटे पाहिजे ७०६६१३८३६८
- नाश्ता बनविण्यासाठी स्त्री/पुरूष पाहिजे ७०६६१३८३६८
- अलिबागमध्ये मध्यवर्ती ठिकाणी 2BHK फ्लॅट, हवेशीर, लिफ्ट, सुविधा, बस स्टॅन्डपासून ५ मिनिटावर बीचपासून ७ मिनिटावर विकणे आहे. संपर्क - ९४०४८०९५२८
- अलिबागमध्ये गाळा भाड्याने पाहिजे मो. ९७६५९८४५२५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

---

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**
**केंद्र कार्यालय अलिबाग**
**निविदा सूचना**

बँकेच्या नांदगाव, ता. मुरुड या शाखेकरीता, तळमजल्यावरील खरेदी केलेल्या स्वमालकीच्या जागेत कौन्टर फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करून घेणेची आहेत.

१) सिव्हील वर्क
२) ॲल्युमिनिअम विंडो
३) फर्निचर
४) POP पेंटींग फॉल सिलिंग
५) इलेक्ट्रिकल वर्क
६) नेमबोर्ड
७) इलेक्ट्रिकल फिक्चर
८) प्लंबिंग वर्क
९) वॉटर प्रुफिंग, पेस्ट कंट्रोल
१०) पीव्हीसी फ्लोअरींग
११) कलर इनामिल
१२) वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे

त्याकरीता खाजगी कॉन्ट्रॅक्टर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ३०.१२.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर करावयात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सही/-
दिनांक : २२.१२.२०२५ उपमुख्य कार्यकारी अधिकारी

---

**दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
**वसुली कार्यालयः** प्लॉट क्र. ८-सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (पश्चिम), ४१०२०६. **नोंद./प्रशासकीय कार्यालयः** २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉईंट, मुंबई-२१. **दूरध्वनी क्र.** (०२२) २७४५८८६२८ **ईमेल पत्ताः** recovery@ncbmumbai.com

**ताबा सह विक्री सूचना**
**(नियम ८ (१) अन्वये)**
**(स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकार यांनी दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (सदर कायदा) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियमन ९ सह वाचावयाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना संदर्भ क्र. एनसीबी/एचओ/आरईसी/१०२/२०२५-२६ दिनांक १४.१०.२०२५ पारित करून, मालमत्तेचे मालक आणि कर्जदार **श्री. संतोष अनंत लोटणकर आणि जामीनदार (१) सौ. राजश्री संतोष लोटणकर, आणि (२) सौ. ज्योती जितेंद्र माने** यांच्याकडून **सदर कायद्याच्या अनुषंगाने सूचनेमध्ये उल्लेखित रक्कम रु. ९,६९,७६४.२८ (रुपये नऊ लाख एकोणसत्तर हजार सातशे चौसष्ट व पैसे अठ्ठावीस मात्र)** सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांमध्ये **परतावा करण्याची** मागणी केली होती.
कर्जदार रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, याद्वारे त्याला/तिला/त्यांना आणि सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सदर नियमनांच्या नियमन ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) अन्वये त्याला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **२० डिसेंबर, २०२५**रोजी सांकेतिक ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, मालमत्तेसह कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेसह केलेला कोणताही व्यवहार दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.च्या **दि. ३०.११.२०२५ रोजी नुसार रु. ९,९८,१५१.२८ (रुपये नऊ लाख अठ्ठ्याण्णव हजार एकशे एक्कावन्न व पैसे अठ्ठावीस मात्र)** आणि दि. ०१.१२.२०२५ पासून त्यावरील पुढील व्याज आणि खर्च या रकमेकरिता प्रभाराच्या अधीन असेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**सदनिका क्र. १, तळमजला, साई रेसिडेन्सी, प्लॉट क्र. बी-२२, सेक्टर-४, असुदगाव, पनवेल-४१०२०६, मोजमाप १५४.३५ चौ.फू. बिल्ट अप.**

**३० दिवसांची वैधानिक सूचना**

उपरोल्लेखित कर्जदार आणि जामीनदार यांना **रु. ९,९८,१५१.२८ (रुपये नऊ लाख अठ्ठ्याण्णव हजार एकशे एक्कावन्न व पैसे अठ्ठावीस मात्र)** आणि व्याज आणि प्रभार या रकमेचा परतावा करण्याकरिता याद्वारे ३० दिवसांची सूचना देण्यात येते, अन्यथा गहाण मालमत्ता सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ अन्वये तरतुदींनुसार विक्री करण्यात येईल.

सही/-
(श्री. आकाश घोलप)
प्राधिकृत अधिकारी,
दि नॅशनल को-ऑप. बँक लि., मुंबई करिता

दिनांकः २०.१२.२०२५
ठिकाणः पनवेल

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल श्री कार्तिकेय शर्मा यांनी खाली नमुद केलेली बिनशेती मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. चंद्रशेखर चटर्जी आणि सौ. कावेरी चंद्रशेखर चटर्जी, दोघेही राहणार फ्लॅट नं . ६०२, प्लॅटीनम, चिंतामणी सीएचएस, प्लॉट नं १८ सी, पाल्म बीच रोड, बुध्देश्वर मंदिर जवळ, सेक्टर १४ अ, सानपाडा, नवी मुंबई, जि. ठाणे ४००७०५ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे मानकिवली, ता. कर्जत, जि. रायगड | २०/९<br>२०/१० | ९.९०.००<br>९.९०.०० | ९९.००<br>९९.०० |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमीन मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. २२.१२.२०२५
**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. शॉप नं. २ पाल टॉवर भिसेगाव ता. कर्जत जि. रायगड. मो. ९३०७८८५७११

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती श्रुती सुधाकर गोंधळी, २) मनिष सुधाकर गोंधळी, ३) हितेश सुधाकर गोंधळी यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वरंडे ता. अलिबाग जि. रायगड | ५०२ | क्षेत्र ०-८५-२०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-८५-२० | ६.०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमूद मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २२/१२/२०२५
**ॲड. प्रिया नंदकुमार पाटील**
रा. ६/००२, राज रत्ना पार्क, ब्रह्मांड कॉम्प्लेक्स, जे.बी. रोड, ठाणे वेस्ट.
मो.नं. ८८७९४९७३०२

---

प्रोसेस जमा रू. /-
ॲड. प्रशांत प्रकाश थळकर
अर्जदाराचे वकील

**जाहीर नोटीस**
**अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १८७/२०२५

श्रीमती रोहीणी संजय कांबळे, वगैरे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर समन्स/नोटीस द्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ हि कै.संजय शिवाजी कांबळे यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हि मुली आहेत. कै. संजय शिवाजी कांबळे हे दिनांक २८.०४.२०१९ रोजी त्यांचे राहते घरी अल्पशा आजाराने मौजे रेवदंडा, विठोबा आळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. अर्जदार हेच कै. संजय शिवाजी कांबळे यांचे कायदेशीर वारस असून अर्जदार यांचे शिवाय कै. संजय शिवाजी कांबळे यांस अन्य कोणीही वारस नाहीत. कै. संजय शिवाजी कांबळे यांचे नावे चारचाकी वाहन एम.एच.०६/बी.एम.६८६४ नोंदण्यात आले आहे. त्या संदर्भात अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात सदर अर्ज दाखल केला आहे. सबब, या जाहीर समन्स द्वारे कळविणेत येते की, अर्जदार यांचे नावे असा दाखला देणेत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक २१.०१.२०२६ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

तरी सदरच्या आदेशास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. या न्यायालयात हजर रहावे. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही असे समजले जाईल व एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/१२/२०२५ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

वरिष्ठ लिपीक — (कोर्टाचा शिक्का) — अधिक्षक
मा. दिवाणी न्यायाधीश व स्तर अलिबाग - रायगड — मा. दिवाणी न्यायाधीश व स्तर अलिबाग - रायगड

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे डिकसळ, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.पॉ. | रूपये | पैसे |
| १) मुकेशकुमार घेवरचंद बरोला व इतर | ३२ | ३ | ०-३९-०० | ३ | २५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २२/१२/२०२५
मो. नं. ९०२८९८२२७७
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ ई मेलः-adv.jayeshmhase@gmail.com

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पाषाणे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.पॉ. | रूपये | पैसे |
| १) श्री. जनार्दन अनंता विशे<br>२) श्री. महेंद्र विजय विशे<br>२) श्री. अशोक अनंता विशे | १४ | ८/ड/१ | ०-४१-०० | ० | १९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २२/१२/२०२५
मो. नं. ९०२८९८२२७७
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ ई मेलः-adv.jayeshmhase@gmail.com

---

बैंक ऑफ इंडिया Bank of India BOI

**ASSET RECOVERY MANAGEMENT BRANCH**
Bank of India Building, First Floor, 28, S. V. Road, Andheri (W), Near Andheri West Railway Station, Mumbai – 400 058. **Tel No. –** 26210406 / 07, **Email:** asset.mnz@bankofindia.bank.in

## E-AUCTION FOR SALE OF IMMOVABLE PROPERTIES

**E-Auction Sale Notice for Sale of Immovable Assets under the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 read with proviso to Rule8(6) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002.**

Notice is hereby given to the public in general and in particular to the following Borrower(s) and Guarantor(s) that the below described immovable properties mortgaged/charged to Bank of India (Secured Creditor), the constructive/physical possession of which has been taken by the Authorized Officers of Bank of India, will be held on "as is Where is" "as is what is", and "whatever there is", for recovery of respective dues as detailed here under against the secured assets mortgaged/charged to Bank of India from respective borrowers and guarantors. The reserve price and earnest money deposit is shown there against each secured asset. The sale will be done by the undersigned through E-Auction platform provided hereunder.

**E-AUCTION SALE NOTICE UNDER SARFAESI ACT2002 CUM NOTICE TO BORROWER / GUARANTOR**
**(E-Auction Date- 28.01.2026)**

(Rs. In Lakh)

| Sr. No | Names of the Account / Borrower/ Guarantor | Description of the properties | Reserve Price/ EMD Amount (In Lakhs) | Minimum Bid Increment | O/s Dues (Excluding Int, Penal Int & Exp) (In Lakhs) | O/s Dues (Excluding Int, Penal Int & Exp) | Date/ Time of on-site inspection of property | Contact No. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **M/s. Realliance Constructions**<br>**Mrs. Kavita Kadam (Proprietress: -Deceased)**<br>**Mr. Anand Kadam (Deceased-Guarantor)**<br>**Mr. Sudhir Malhotra (Deceased-Guarantor)**<br>**Ms. Aishwarya Anand Kadam Legal Heir of Mrs. Kavita Anand Kadam & Mr. Anand Kadam (Deceased-Proprietress / Guarantor)**<br>**Mr. Piyush Anand Kadam Legal Heir of Mrs. Kavita Anand Kadam & Mr. Anand Kadam (Deceased-Proprietress / Guarantor)**<br>**Smt. Manjeet Malhotra, Legal Heir of Mr. Sudhir Malhotra (Deceased-Guarantor)** | Plot No. 116, 117, 118, 120, 121, 122, 123, 125, 127 & 130, bearing Survey No. 36/2 A (2) and 37/1 at Village- Kothimbe, Taluka- Karjat, Dist.- Raigad **Land Area: 53380 Sq. Ft.** **( P h y s i c a l possession with Bank )** | **180.00 / 18.00** | **1.00** | **726.99** | **200002271396** | **28.12.2025 1.00 PM to 2.30 PM** | **9769641828** |

**Terms and Conditions of the E-auction are as under:** E-Auction is being held on "AS IS WHERE IS" basis, "AS IS WHAT IS BASIS" and "WHATEVER THERE IS BASIS" and will be conducted "On Line".
The auction sale will be "online E-auction / Bidding through website –URL: **https://BAANKNET.com**
**(E-Auction Date- 28.01.2026)**
(Between 11:00 AM and 05:00 PM with unlimited extensions of 10 minutes each)
E-auction bid form Declaration, General Terms and Conditions of online auction sale are available in websites- **https://www.bankofindia.bank.in**
Bidder may visit URL: **https://BAANKNET.com,** where "Guidelines" for Bidders are available with educational videos. Bidders have to complete following formalities well in advance:-

- ❖ **Step 1:** Bidder / Purchaser Registration: Bidder to Register on e-Auction portal URL: **https://BAANKNET.com** using his mobile no. and E-mail ID. (PDF (Buyer Manual) describing the step by step process for registration is available for download in the home page under Help option at the bottom of the page.)
- ❖ **Step 2 :** KYC Verification: Bidder to upload requisite KYC documents. KYC documents shall be verified by e-auction service provider (may take 2 working days).
- ❖ **Step 3** : Transfer of EMD amount to his global EMD wallet: Online /Off-line transfer of funds using NEFT / Transfer, using challan generated on E-auction portal.
- ❖ **Step 1 to Step 3** should be completed by bidder well in advance, before e-auction date. Bidder may also visit : **https://BAANKNET.com** for registration and bidding guidelines
- ❖ Helpline Details / Contact Person Details of : **BAANKNET**

| Name | Team | Number | e-Mail |
|---|---|---|---|
| **Helpdesk Number** | **PSB Alliance** | 8291220220 | **support.ebkray@psballiance.com**<br>**support.ebkray@procure247.com** |
| **Mr. Dharmesh Asher** | **PSB Alliance** | 9892219848 | **avp.projectmanager2@psballiance.com** |
| **Mr. Sudhir Panchal** | **iSourcing Technology** | 8160205051 | **sudhir@procure247.com** |

1. Intending bidders shall hold a valid e-mail address, for further details and query please contact **BAANKNET** Helpdesk Number 8291220220 Helpline **e-mail ID support.BAANKNET@psballiance.com and support.ebkray@procure247.com**
2. To the best of knowledge and information of the authorized officer there is no encumbrances on the property/ies. However, the intending bidders should make their own independent inquiries regarding the encumbrances, title of the property/ies put on auction and claims/rights/ dues effecting the property, prior to submitting their bid. The e-auction advertisement does not constitute and will not be deemed to constitute any commitment or any representation of the bank. The property is being sold with all the existing and future encumbrances whether known or unknown to the bank. The authorized officer/secured creditor shall not be responsible in any way for any third party claims/rights/dues. No claim of whatsoever nature will be entertained after submission of the online bid regarding property/ies put for sale.
3. Earnest money deposit (EMD) shall be deposited through RTGS/NEFT/Fund Transfer to the bank account as guided and mentioned in : **https://BAANKNET.com** portal before participating in the bid online.
4. The KYC documents are 1.Proof of Identification (KYC) viz. Voter ID Card/Driving License/Passport 2. Current Address Proof for communication 3. PAN Card of the bidder 4. Valid e-mail ID/contact number of the bidder etc.
5. Date of inspection will be as mentioned in the table above with prior appointment with above mentioned contact numbers.
6. Prospective bidders may avail online training on e-auction from : **https://BAANKNET.com** portal.
7. Bids shall be submitted through online procedure only in the prescribed formats with relevant details.
8. Bidders shall be deemed to have read and understood the terms and conditions of sale and be bound by them.
9. The bid price to be submitted shall be above the reserve rice and bidders shall improve their further offers in multiples of **Rs.10,000/- (Rupees Ten Thousand) for Reserve Price up to Rs.20.00 lakhs/Rs.25,000/- (Rupees Twenty Five Thousand) For Reserve Price above 20.00lakh – up to 50.00 lakhs/ Rs.50,000/-(Rupees Fifty thousand) For Reserve Price above 50.00lakhs - Up to 1.00 Crore / Rs.1,00,000/- (Rs. One Lakh) For Reserve Price above Rs.1.00 Crore –up to Rs.5.00 Crore / Rs. 5.00 Lakhs (Rupees Five Lakhs) for Reserve price above Rs.5.00 Crore – up to Rs.10.00Crore/ and 10.00 Lakhs (Rupees Ten Lakhs) for Reserve Price above Rs.10 Crore.**
10. It shall be the responsibility of the interested bidders to inspect and satisfy themselves about the property before submission of the bid.
11. The earnest money deposit (EMD) of the successful bidder shall be retained towards part sale consideration and the EMD of the unsuccessful bidder will be returned on the closure of the e-auction sale proceedings.
12. The earnest money deposit shall not bear any interest, the successful bidder shall have to pay 25% of the purchased amount (including earnest money already paid immediately on acceptance of bid price by authorized officer on the same day or maximum by next day and the balance of the sale price on or before 15th day of sale. The auction sale is subject to confirmation by the bank. Default in deposit of the amount by the successful bidder at any stage would entail forfeiture of the whole money already deposited and property shall be put to re-auction and the defaulting bidder shall have no claim/right in respect of the property/amount.
13. The prospective qualified bidders may avail online training on e-auction from : **https://BAANKNET.com** portal prior to the date of e-auction neither the authorized officer nor the bank will be held responsible for any internet network problem power failure, any other technical lapse/ failure etc. in order to ward off such contingent situation the interested are requested to ensure that they are technically well equipped with adequate power backup etc. for successfully participating in the e-auction event.
14. Purchaser shall bear the stamp duties charges including those of sale certificate / registration/ charges including all statutory dues payable to the government, taxes and rates and outgoing both existing and future relating to the property.
15. Buyer shall bear the TDS wherever applicable including other statutory dues, registration charges, stamp duty etc.
16. The authorized officer/ bank is not bound to accept the highest offer and has absolute right and discretion to accept or reject any or all offers or adjourn /postpone/cancel the e-auction or withdraw any property or portion there-of from the auction proceeding at any stage without assigning any reason there for.
17. The sale certificate will be issued in the name of the purchaser(s)/applicant(s) only and will not be issued in any other name(s).
18. The sale shall be subject to rules/conditions prescribed under the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act 2002. Further details inquiries if any on the terms and conditions of sale can be obtained from the contact numbers given.
19. If any participant deposits the EMD after registering himself and afterwards opt to not to bid, can reverse the bid amount through system as specified in : https://BAANKNET.com portal.
20. GST, wherever applicable, to be borne by successful bidder.

**SALE NOTICE TO BORROWER/ GUARANTORS**

The undersigned being the Authorized Officers of Bank of India are having full powers to issue this notice of sale and exercise all powers of sale under securitization and reconstruction of financial assets and Enforcement of Security Interest Act, 2002 and the rules framed there under. You have committed default in payment of the dues with interest, cost and charges etc. in respect of the advances granted by the bank mentioned above. Hence, the Bank has issued demand notices to all of you under section 13(2) to pay the amount mentioned there on within 60 days. You have failed to pay the amount even after the expiry of 60 days. Therefore, the Authorized Officers in exercise of the powers conferred under section 13(4), took possession of the secured assets more particularly described in the schedule mentioned above. Notice is hereby given to you to pay the sum as mentioned above before the date fixed for sale, failing which the property will be sold and balance due if any will be recovered with interest and cost from you. Please note that all expenses pertaining to demand notice, taking possession, valuation and sale of assets etc. shall be first deducted from the sale proceeds which may be realized by the undersigned and the balance of the sale proceeds will be appropriated towards your liability as aforesaid. You are at liberty to participate in the auction to be held on the terms and conditions thereof including deposit of earnest money.

**Sd/-**
**Authorized Officer**
**Bank of India**
**Asset Recovery Management Services Branch**

**Date: 22.12.2025**
**Place: Mumbai**

# अलिबाग न.प.मधील आघाडीचे विजयी शिलेदार

**प्रभाग क्र. १**
अ) संतोष मुधकर गुरव– शेकाप — मिळालेली मते : 546
ब) संध्या शैलेश पालवणकर– शेकाप — मिळालेली मते : 782

**प्रभाग क्र. २**
अ) सुषमा नित्यानंद पाटील– शेकाप — मिळालेली मते : 657
ब) प्रशांत मधुसूदन नाईक– शेकाप — बिनविरोध निवड

**प्रभाग क्र. ३**
अ) डॉ. साक्षी गौतम पाटील–शेकाप — मिळालेली मते : 833
ब) आनंद अशोक पाटील–शेकाप — मिळालेली मते : 902

**प्रभाग क्र. ५**
अ) ॲड. निवेदिता राजेंद्र वाघमारे– शेकाप — मिळालेली मते : 1136
ब) समीर मधुकर ठाकूर– काँग्रेस — मिळालेली मते : 1233

**प्रभाग क्र. ६**
अ) ॲड. ऋषिकेश रमेश माळी–शेकाप — मिळालेली मते : 396
ब) ॲड. अश्विनी ऋषिकेश ठोसर–शेकाप — मिळालेली मते : 376

**प्रभाग क्र. ७**
अ) ॲड. मानसी संतोष म्हात्रे–शेकाप — मिळालेली मते : 786

**प्रभाग क्र. ८**
अ) ॲड. निलम किशोर हजारे–शेकाप — मिळालेली मते : 766
ब) अनिल रमेश चोपडा–शेकाप — मिळालेली मते : 688

**प्रभाग क्र. ९**
अ) योजना प्रदीप पाटील–शेकाप — मिळालेली मते : 1141
ब) सागर शिवनाथ भगत–शेकाप — मिळालेली मते : 840

**प्रभाग क्र. १०**
अ) शैला शेषनाथ भगत–शेकाप — मिळालेली मते : 759
ब) वृषाली महेश भगत–शेकाप — मिळालेली मते : 934

## अलिबाग झाले लालेलाल

**पान ३ वरुन :** अलिबाग नगरपरिषदेच्या वीस नगरसेवकपदांच्या जागांपैकी १७ जागांवर महाविकास आघाडीचे शेकाप–काँग्रेसच्या उमेदवारांनी वर्चस्व कायम ठेवले. तसेच नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक या भरघोस मतांनी निवडून आल्या. या विजयाचा कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करण्यात आला. स्टेट बँक इंडियापासून मिरवणुकीला सुरुवात झाली. ढोलताशांसह डिजेवरील गाण्यांच्या ठेक्यावर अनेकांचे पाय थिरकले. लाल गुलालाची उधळण कार्यकर्त्यांनी केली. संपूर्ण शहर लालेलाल झाले होते. अक्षया नाईकससह महाविकास आघाडीच्या शेकाप व काँग्रेसच्या विजयी उमेदवारांचे अलिबागकरांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले. काहींनी औक्षण करुन, तर काहींनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. काहींनी रंगाची उधळण केली. तर, काही जण हातात लाल बावटा व काँग्रेसचा झेंडा घेऊन फिरवत होते. एक वेगळा उत्साह पाहावयास मिळाला. ही रॅली मारुती नाका, बालाजी नाका, महावीर चौक ते शेतकरी भवनपर्यंत काढण्यात आली. अखेर या रॅलीचे रुपांतर सभेमध्ये झाले. त्यावेळी हजारो कार्यकर्ते शेकाप भवन परिसरात जमले होते.

## शेकापचे नेते जयंत पाटील यांची उपस्थिती

सकाळी दहा वाजता निकालाला सुरुवात झाली. जस जसा निकाल जवळ येत होता, तस तसे कार्यकर्ते मतमोजणीच्या ठिकाणी जाऊ लागले. मतमोजणी केंद्रापासून काही अंतरावर जल्लोष केला. शेकापचे नेते जयंत पाटील यांनीदेखील त्या ठिकाणी जाऊन कार्यकर्त्यांची भेट घेतली. विजयी उमेदवारांना भेटून त्यांचे अभिनंदन केले. पराभूत झालेल्या उमेदवारांची विचारपूस करून त्यांना पुन्हा नव्याने उभे राहण्याचे बळ दिले. यावेळी शेकाप नेते शंकरराव म्हात्रे, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदीप नाईक, काँग्रेसचे जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, काका ठाकूर, रवींद्र ठाकूर, ॲड. प्रवीण ठाकूर, तसेच पिंट्या तथा अमिर ठाकूर, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, अनिल पाटील आदी आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरणमध्ये भाजपाची जुलमी सत्ता उद्ध्वस्त

## ■ नगराध्यक्षपदी भावना घाणेकर दणदणीत विजयी



**| उरण | प्रतिनिधी |**

उरण नगरपालिकेत गेली अनेक वर्षे माजलेली भाजपाची दडपशाही, भ्रष्टाचार आणि जनतेला गृहीत धरणारी राजवट अखेर उरणकरांनी मतपेटीतून चिरडून टाकली आहे. विकासाच्या नावाखाली शहराला अंधारात लोटणाऱ्या, जनतेच्या पैशांवर डल्ले मारणाऱ्या आणि उरणला दलालांच्या हवाली करणाऱ्या भाजप आमदार महेश बालदी आणि त्यांच्या समर्थक टोळीला उरणच्या जनतेने थेट जागा दाखवली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीने घवघवीत यश मिळवत नगरपालिकेतील भाजपाचा किल्ला जमीनदोस्त केला आहे.

नगराध्यक्षपदी महाविकास आघाडीच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी दणदणीत मताधिक्याने विजय मिळवला असून, एकूण २१ पैकी ९ नगरसेवक महाविकास आघाडीचे निवडून आले आहेत. तर, भाजपचे ११ नगरसेवक निवडून आले. हा निकाल म्हणजे केवळ नगरपालिकेतील सत्तांतर नसून, आमदार महेश बालदी यांच्या तथाकथित राजकीय साम्राज्यावर बसलेला जबरदस्त घाव आहे.

भाजपाच्या सत्ताकाळात उरण शहराचा सर्वांगीण विकास होण्याऐवजी शहराची अक्षरशः राखरांगोळी करण्यात आली. रस्त्यांची चाळण, पाण्याची टंचाई, अस्वच्छता, बकाल नागरी सुविधा आणि जनतेच्या प्रश्नांकडे सत्ताधाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष हेच भाजपाच्या कारभाराचे दर्शन होते. केंद्रात व राज्यात सत्ता असूनही उरणकरांच्या नशिबी भकासपणा आला. तरीही 'आमदार दमदार' अशा पोकळ वल्गना करून जनतेची दिशाभूल केली जात होती. अखेर उरणच्या जनतेचा संयम सुटला आणि यावेळी भाजपाला धडा शिकवण्याचा निर्धार मतपेटीतून प्रत्यक्षात उतरवण्यात आला.

नगरपालिका निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सुरुवातीला महाविकास आघाडीकडे नगराध्यक्षपदासाठी ठोस उमेदवार नव्हता. मात्र, भाजपविरोधात सर्वपक्षीय एकजूट करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर यांच्या नावावर एकमुखी शिक्कामोर्तब करण्यात आले. उमेदवारी जाहीर होताच भावना घाणेकर यांनी सत्ताधारी भाजपाच्या गलथान व भ्रष्ट कारभारावर थेट हल्ला चढवला. प्रचारादरम्यान भावना घाणेकर यांनी जनतेच्या पैशांची कशी लूट झाली, विकासाच्या नावाखाली कसे घोटाळे झाले, हे निर्भीडपणे सभांमधून मांडले. विशेष म्हणजे एका महिला उमेदवाराने एवढ्या आक्रमकतेने सत्ताधाऱ्यांचा पर्दाफाश केल्याने जनतेत मोठ्या प्रमाणात मतपरिवर्तन झाले. विशेषतः महिला वर्गात भाजपाविरोधात तीव्र असंतोष निर्माण झाला आणि त्याचा थेट फटका भाजपाला बसला.

या निकालामुळे उरण नगरपालिकेतील भाजपाची जुलमी सत्ता पूर्णतः संपुष्टात आली असून, आमदार महेश बालदी यांच्या राजकीय दबदब्यालाही जबरदस्त हादरा बसला आहे. उरणमध्ये भाजपाची उतरती कळा सुरू झाली नसून, त्यांच्या सत्तेचा ऱ्हास सुरू झाल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे.

# मुरूडच्या नगराध्यक्षपदी आराधना दांडेकर विजयी



**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड जंजिरा नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षाच्या पदाच्या अत्यंत चुरशीच्या लढतीत अजित पवार गट राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या उमेदवार आराधना मंगेश दांडेकर यांनी प्रतिस्पर्धी उमेदवारांचा पराभव करीत विजय मिळवला.

या निवडणुकीत प्रभागनिहाय विजयी झालेले उमेदवार पुढीलप्रमाणे आहेत. प्रभाग १ अ मधून उबाठा पक्षांच्या श्रध्दा अपराध व ब उबाठा पक्षांकडून रुपेश पाटील यांनी विजय मिळवला. प्रभाग २ अ मधून शिंदे गट रुपेश रणदिवे, ब मधून अजित पवार गट– प्रीती चौलकर. प्रभाग ३ अ मधून उबाठाच्या देवायानी गुरव, ब मधून शिंदे गट– विरेंद्र भगत. प्रभाग ४ अ मधून शिंदे गट नितीन आंबुर्ले, ब शिंदे गट यास्मिन जाहीद कादिरी. प्रभाग ५ अ मधून अजित पवार गट प्रमिला माळी, ब मधून अजित पवार गट तमीम इब्राहिम ढाकम. प्रभाग ६ अ शिंदे गट नगमाना खानजादे, ब मधून उबाठाकडून आदेश दांडेकर. प्रभाग ७ अ मधून शिंदे गट अंकिता गुरव, प्रभाग ब मधून शिंदे शिवसेना मनिष विरुकुड. प्रभाग ८ अ अजित पवार गट प्रांजली मकु, प्रभाग ब मधून शिंदे शिवसेना विजय पाटील, प्रभाग ९ अ शिंदे शिवसेना पांडुरंग आरेकर, ब मधून आय काँग्रेसकडून सुगंधा पांडुरंग मकु. प्रभाग १० अ मधून शिंदे शिवसेनेकडून वैदेही प्रकाश आरेकर, ब मधून शिंदे शिवसेनेकडून श्रीकांत नारायण खोत विजयी झाले.

# श्रीवर्धनमध्ये प्रस्थापितांना धक्का

## थेट नगराध्यक्षपदी उबाठाचे अतुल चौगुले विजयी



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन नगरपरिषदेमध्ये नाट्यमय परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वांचे अंदाज फोल ठरवत श्रीवर्धन नगरपरिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या १५ जागा निवडून आलेल्या असल्या तरीही थेट नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये उबाठाचे ॲड. अतुल चौगुले यांनी २१९ मतांनी विजय संपादन केला आहे. या विजयाने अतुल चौगुले यांनी राजकीय वर्तुळात आपली छाप उमटवतानाच शहराच्या राजकारणात नवा इतिहास घडवला आहे. प्रस्थापित, अनुभवी आणि ताकदवान उमेदवारांना पराभवाची चपराक देत ॲड. चौगुले यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे. स्थानिक शिवसैनिकांच्या संघटित ताकदीसह कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांचे हे फलित असल्याची प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे.

प्रचारादरम्यान वेगवेगळ्या प्रकारचा दबाव, प्रलोभनं यांना न जुमानता त्यांनी घराघरांत जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. शहरातील पाणी, रस्ते, रहदारी स्वच्छता, शिक्षण व रोजगार यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. या विजयामुळे काम आणि विचार महत्त्वाचे हा संदेश ठळकपणे समोर आला आहे. त्यांच्या साध्या, प्रामाणिक आणि लोकाभिमुख भूमिकेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याच विश्वासावर मतदारांनी कौल देत त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. या विजयामागे शिवसेनेच्या स्थानिक नेतृत्वासह बूथस्तरावरील शिवसैनिकांची मेहनत, नियोजनबद्ध प्रचार आणि एकजुटीची ताकद महत्त्वाची ठरली. विजयाची घोषणा होताच श्रीवर्धनमध्ये जल्लोषाचं वातावरण निर्माण झालं असून, शिवसैनिकांनी फटाक्यांची आतषबाजी करत आनंद व्यक्त केला. एकूण वीस प्रभागांपैकी राष्ट्रवादी अजित पवार गट १५ शिंदे गट ३ व भाजप २ असे उमेदवार निवडून आले असून थेट नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत ॲडव्होकेट अतुल चौगुले यांनी बाजी मारली. या विजयानंतर बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतुल चौगुले यांनी, हा विजय माझा नसून श्रीवर्धनच्या जनतेचा आणि प्रत्येक शिवसैनिकाचा आहे, असे स्पष्ट केले.

# रोह्यात सेना-भाजपाला दोन जागा



छाया : जुगल दवे.

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा नगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत बलाढ्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गटाने) शिवसेना–भाजपा युतीसह काँग्रेस आय, शिवसेना (उबाठा) या विरोधी पक्षांचा धुव्वा उडवला. या निवडणुकीत नेहमीप्रमाणे काही ठिकाणी रईस मित्र मंडळाकडून अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. त्या सर्व अपक्ष उमेदवारांच्या विजयाच्या अपेक्षादेखील भंग झाल्या असून, त्यांचा दणदणीत पराभव झाला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गटाचे) नगराध्यक्षपदाचे उमेदवार वनश्री समीर शेडगे यांच्यासहित २० पैकी १८ जागा जिंकून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा निर्विवाद सत्ता काबीज केली. तर, शिंदेंची शिवसेना आणि भाजपाला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार वनश्री समीर शेडगे यांना एकूण ८५८६ मते मिळवून शिवसेनेच्या शिल्पा अशोक धोत्रे यांचा ४६९५ मतांनी दणदणीत पराभव केला. शिल्पा धोत्रे यांना केवळ ३८९१ मतांवर समाधान मानावे लागले.विशेष म्हणजे, यंदाच्या निवडणुकीत खा. सुनील तटकरे यांच्या घरच्या मैदानावर शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले व आ. महेंद्र दळवी यांनी शड्डू ठोकले होते.

यावेळी उमेदवारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात हाऊसफुल्ल गर्दी होती. अशा परिस्थिती उमेदवारी न मिळालेल्या राष्ट्रवादीच्या घरभेदी कार्यकर्त्यांनी स्वपक्षातील उमेदवारांना पाडण्यासाठी कंबर कसली होती. मात्र, मतदारांनी या घरभेदी मंडळींना थारा न देता पुन्हा एकदा सत्ता राष्ट्रवादी कडे सुपूर्द केली. तसेच नेहमीप्रमाणे अपक्ष उमेदवारांचे मनसुबे भंगाराच्या भावात गेल्याने चित्रदेखील निकालावरून स्पष्ट होत आहे.

### वडील–लेक दोघेही रडले

नऊ वर्षांपूर्वी माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांनी सहा मतांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक गमावली होती. तेव्हापासूनच त्यांच्या मनाची घालमेल त्यांची लेक वनश्री व कुटुंबियांनी पाहिली होती. किंबहुना ती रोहेकरांनीसुद्धा अनुभवली होती. रविवारी निकाल जाहीर झाल्यानंतर बाप–लेक दोघांना ही अश्रू अनावर झाले. एकमेकाला मिठी मारत दोघांनी अश्रूंना वाट मोकळी केली.

# कर्जतमध्ये परिवर्तन विकास आघाडीची बाजी

## नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या पुष्पा दगडे विजयी



**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी आणि इतर मित्र पक्षांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेल्या कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार पुष्पा हरिश्चंद्र दगडे ४४७० मतांनी विजयी झाल्या आहेत, त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या डॉ. स्वाती अक्षय लाड यांचा पराभव केला आहे.

कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी व इतर मित्र पक्षांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत परिवर्तन विकास आघाडी स्थापन करण्यात आली होती तर भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट आणि आरपीआय यांची महायुती करण्यात आली होती, निवडणुकीत नगर परिषदेवर कर्जत परिवर्तन विकास आघाडीने झेंडा फडकवला आहे, यामध्ये कर्जत परिवर्तन विकास आघाडीच्या राष्ट्रवादीचे–८, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे–४, अपक्ष–१ असे १३ उमेदवार निवडून आले आहेत, तर महायुतीमध्ये शिंदे गटाचे–७, भाजपचा–१ असे आठ उमेदवार निवडून आले आहेत.

प्रभाग क्रमांक १ अ) अरुणा प्रदीप वायकर : शिवसेना शिंदे गट : विजयी (११९७) , ब) किशोर पांडुरंग कदम : शिवसेना शिंदे गट : विजयी (९५६), प्रभाग क्रमांक २ अ) कोयल चैतन्य कन्हेरीकर : शिवसेना शिंदे गट : विजयी (१३०६), ब) संकेत जनार्धन भासे: शिवसेना शिंदे गट : विजयी (१४३९). प्रभाग क्रमांक ३ अ) अंजली अतुल कडू राष्ट्रवादी गट : विजयी (११६७), ब) संतोष सुरेश पाटील : उबाठा गट : विजयी (९३६). प्रभाग क्रमांक ४ अ) सुमिता योगेश गायकवाड राष्ट्रवादी गट : विजयी (११९४), ब) महेंद्र बबन चंदन : राष्ट्रवादी गट : विजयी (१५६३). प्रभाग क्रमांक ५ अ ) राधिका पिंट्या पवार राष्ट्रवादी गट : विजयी (९३४), ब) विजय किसन हजारे शिवसेना शिंदे गट : विजयी (८६७). प्रभाग क्रमांक ६ अ) सुवर्ण केतन जोशी उबाठा गट : विजयी (१४७७), ब) प्रशांत वसंत पाटील अपक्ष (परिवर्तन आघाडी पुरस्कृत) गट : विजयी (१३९७). प्रभाग क्रमांक ७ अ) वैभव हेमंत सुरावकर शिवसेना शिंदे गट : विजयी (१२७६ ), ब) नेहा निलेश शिंदे राष्ट्रवादी गट : विजयी (१०९२). प्रभाग क्रमांक ८ अ) रामदास आत्माराम गायकवाड भाजपा गट : विजयी (९२३), ब) सुचिता देवेंद्र खोत उबाठा गट : विजयी (१३४४), प्रभाग क्रमांक ९ अ) कुमेश पांडुरंग मोरे राष्ट्रवादी गट : विजयी (१४४१), ब) जानवी सुदेश देवघरे शिवसेना शिंदे गट : विजयी (१२५१). प्रभाग क्रमांक १० अ) हर्षाली उमेश गायकवाड राष्ट्रवादी गट : विजयी (१७६२), ब) अशोक बबन राऊत राष्ट्रवादी गट : विजयी (१४७९), क) मानसी महेंद्र कानिटकर उबाठा गट : विजयी (१५८०).

निवडणुकीअगोदर ज्या ज्या उमेदवारांनी पक्ष बदलले, ते सर्व या निवडणुकीत पराभूत झाले आहेत.



# माथेरानमध्ये महायुतीची सत्ता

## ■ चंद्रकांत चौधरी नगराध्यक्षपदी

**| माथेरान | प्रतिनिधी |**

सात वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पार पडलेल्या माथेरान नगरपरिषद निवडणुकीच्या निकालात प्रत्येक टप्प्यात चुरस जाणवत होती. एकूण मतदान ३४४५ इतके पार पडले. नोटाला १७ मते होती. अखेरीस नगराध्यक्ष पदाच्या लढतीत शिवसेना शिंदे गटाचे चंद्रकांत चौधरी यांना २२५७ मते मिळाली असून, तब्बल १०६९ मतांनी विजय मिळवत नगराध्यक्षपद पटकावले. प्रतिस्पर्धी शिवराष्ट्र पॅनेलचे उमेदवार अजय सावंत यांना ११८८ मते मिळाली.

यंदाची निवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरली होती. तथापि, निकालाने सर्व तर्कवितर्कांना पूर्णविराम देत शिवसेना–भाजप युतीने नगरपरिषदेत एकहाती सत्ता मिळवली आहे. प्रभागवार निकाल पुढीप्रमाणे : प्रभाग क्रमांक १ केतन रामाने : शिवसेना शिंदे गट : विजयी, अनुसया ढेबे : राष्ट्रवादी अजित पवार गट : विजयी. प्रभाग क्रमांक २ सीताराम कुंभार : राष्ट्रवादी अजित पवार गट : विजयी, लता ढेबें : शिवसेना शिंदे गट : विजयी. प्रभाग क्रमांक ३ रिजवाना शेख : शिवसेना शिंदे गट : विजयी, शिवाजी शिंदे : शिवसेना शिंदे गट : विजयी. प्रभाग क्र ४ गौरंग वाघेला : शिवसेना शिंदे गट : विजयी, प्रतिभा घावरे : भाजपा : विजयी झाले आहेत.

# पेणमध्ये भाजपचा झेंडा

## ५८६१ मतांनी प्रितम पाटील यांचा विजय



**| पेण | प्रतिनिधी |**

पेण नगरपालिकेमध्ये भाजपने एकहाती सत्ता काबीज केली आहे. निवडणुकीचे कल पहिल्यापासूनच एकतर्फी लागायला सुरूवात झाल्याने भाजपचा विजय निश्चित मानला जात होता. पहिल्या फेरीपासूनच प्रितम पाटील आघाडीवर होत्या. त्यांनी प्रतिस्पर्धी रिया धारकर यांना ५८६१ मतांनी पराभरव केले, तर काँग्रेसच्या नंदा म्हात्रे यांना १३,५८६ मतांनी मागे टाकले आहे. एकंदरीत, काँग्रेसला फक्त ६८७ मते मिळाली आहेत.

एकूण २४ नगरसेवकांमध्ये १२ नगरसेवक भाजपचे असून, ५ नगरसेवक हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. ३ नगरसेवक संतोष श्रृंगारपुरे यांची नगरविकास आघाडी, २ नगरसेवक आम्ही पेणकर विकास आघाडी, १ शिंदे गट शिवसेना, १ उबाठा शिवसेना गट असे पक्षीय बलाबल आहे. प्रभाग क्रमांक १ मधून कलावती शशिकांत पाटील ११४८ मत घेऊन विजयी भाजप, संतोष विनायक श्रृंगारपुरे ११७० मते घेऊन विजयी नगरविकास आघाडी, प्रभाग क्रमांक २ मधून पल्लवी प्रसाद कालेकर ११३४ मते घेऊन विजय भाजप, प्रवीण शंकर पाटील १०९७ मते घेऊन विजयी आम्ही पेणकर, प्रभाग क्रमांक ३ मधून सुजाता यशवंत डाकी १३४४ मते घेऊन विजय नगरविकास आघाडी, संजय परशुराम म्हात्रे १२३६ मते घेऊन विजयी नगरविकास आघाडी.

# महायुतीचे कुलदीपक शेंडे नगराध्यक्षपदी

**| खोपोली | प्रतिनिधी |**

खोपोली नगरपालिकेच्या निवडणुकीत शिंदे गट, भाजप, आरपीआय महायुतीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार सुनिल पाटील यांच्यात दुरंगी लढत झाली असून, अटीतटीच्या लढाईत कुलदीपक शेंडे (एकूण मते २०४६९ मते) तर सुनिल पाटील यांना (१९३५१ मते) मिळाली असून, फक्त १११८ मतांनी निसटता पराभव झाला. दरम्यान, डीपी रोड परिसरातील सेंट मेरी स्कूलमध्ये झालेल्या मतमोजणी केंद्रात सकाळपासूनच सर्वच पक्षातील कार्यकर्त्यांनी एकच गर्दी केली होती.

एकूण १५ प्रभागात शिंदे गट–१४, अजित पवार राष्ट्रवादी –७, अपक्ष –१, भाजप –४, शेकाप–४, शरद पवार गट– १ असे उमेदवार निवडून आले आहेत. अजित पवार पक्षाचे नेते माजी नगराध्यक्ष माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, माजी नगरसेवक किशोर पानसरे, शिंदे गटाचे माजी नगरसेविका माधवी रिठे यांचा पराभव झाल्याने मोठा धक्का बसला आहे.

भाजपाचे किशोर पाटील यांनी आत्तापर्यंत अपराभूत जयेष्ठ नेते माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांचा दारुण पराभव करीत ते जायन्ट किलर ठरले.

शेकापचे तस्लिम नासिर पाटील व सोमा सुतक ह्या शेकापच्या पॅनलचा प्रभाग ९ मधून विजय झाला व प्रभाग १२ मधून निझाम जलगावकर व विनिता औटी कांबळे या शेकाप पॅनलचा विजय झाला. तर शेकापचे कट्टर कार्यकर्ते माजी नगर सेवक कैलास गायकवाड यांच्या पत्नी हर्षद कैलास गायकवाड यांचा राष्ट्रवादीतून विजय झाला असला तरी शेकापने समर्थन दिले होते.

प्रभाग तीनमधून २ वेळा विजयी बलाढ्य उमेदवार किशोर पानसरे यांचा शिवसेनेचे अनिल सानप यांच्याकडून पराभव हा धक्कादायक निकाल ठरला. प्रभाग ६ मधून सर्वच राष्ट्रीय पक्षाचे मात्तबर उमेदवर रिंगणात असताना व्यापारी बाजारपेठेतून अपक्ष उमेदवार राहुल गायकवाड यांचा विजय ही धक्कादायक ठरला.

# महाड नगरपरिषदेवर शिवसेनेचा भगवा

## नगराध्यक्षपदी सुनील कविस्कर



**| महाड | प्रतिनिधी |**

सुमारे चार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर झालेल्या ऐतिहासिक महाड नगर परिषदेच्या निवडणुकीत मागील तीन दशकांपासून प्रयत्न करणाऱ्या शिवसेनेने महाडकर मतदारांच्या साथीने एकहाती लढत देत नगरपरिषदेवर भगवा फडकला.

या निवडणुकीसाठी एकूण २३ हजार १२४ मतदारांची नोंद करण्यात आली होती. त्यापैकी १६,४२६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला. प्रभाग १ – २४१२ मतदारांपैकी मतदान १७३० :अ रणजित साळी ९३४ विजयी, राष्ट्रवादी काँग्रेस अ नंदा नितीन काप ८०२ शिवसेना शिंदे गट, नोटा ३२. ब वैशाली अमोल रक्ते ८९६ राष्ट्रवादी काँग्रेस, ब सान्वी सूरज सावंत ७६४ शिवसेना शिंदे गट, नोटा ३२. प्रभाग २– २६९१ मतदारांपैकी मतदान २१२०. अ भारती सकपाळ ९८२ राष्ट्रवादी काँग्रेस, अ पालवी गोळे ९८७ शिवसेना विजयी, अ प्रभा सोंडकर ४१ काँग्रेस, नोटा ३१. ब महेश शेडगे ९९९ राष्ट्रवादी काँग्रेस विजयी, ब राजू शिंदे ९९१ शिवसेना, नोटा ३१. प्रभाग ३– १७९० मतदानापैकी १२६९ मतदान. अ कविता महाडिक ६०२ शिवसेना गीतांजली महाडिक ६२० राष्ट्रवादी काँग्रेस विजयी, मानसी वाघमारे ३४ काँग्रेस, नोटा १४, ब प्रमोद महाडिक ६४७ शिवसेना विजयी, वैभव चांदोरकर ५९८ राष्ट्रवादी काँग्रेस, नोटा २४. प्रभाग ४– २२३५ मतदानापैकी ९७९ मतदान. गायत्री कविस्कर १०३४ शिवसेना विजयी, सिद्धी कंक ९१६ राष्ट्रवादी काँग्रेस, नोटा २९.


PNP
INFRAPROJECTS
WISHING YOU
Mrs. Supriyatai Jayant Patil
and
Mrs. Chitralekha Nrupal Patil
happy Birthday
With Best Compliments From
PNP INFRAPROJECTS PVT. LTD
TEL: GATEWAY: 2288 5220 / 2288 5221
MANDWA : 021 41- 237087
ALIBAUG : 021 41- 225403
ADD: GATEWAY : GATEWAY PLAZA,
COUNTER No. 8 MANDWA : JETTY
ALIBAUG : PRABHAKAR PATIL NAGAR




**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)


PNP
MARITIME
WISHING YOU
Mrs. Supriyatai Jayant Patil
and
Mrs. Chitralekha Nrupal Patil
happy Birthday
With Best Compliments From
PNP MARITIME SERVICES PVT.LTD.
ADMIN. OFFICE :- 2ND FLOOR, LANSDOWNE HOUSE, MAHAKAVI BHUSHAN ROAD, COLABA, MUMBAI 400 001. TEL. +91-2288 4536/37/38/39/40 FAX : +91-2288 4535
REGD. OFFICE : A-5,IONIC, 18, ARTHUR BUNDER ROAD, COLABA, MUMBAI 400 005, INDIA.
PORT OFFICE : PNP PORT DHARAMTAR AT, SHAHABAJ, DIST. RAIGAD, TEL. : +91-2143-320766, WEBSITE : www.pnpport.com
Government of India Copyright 2018. Reproduced from Survey of India Tide Table for the port of Mumbai (Apollo Bunder) with the permission of Surveyor General of India

कृषीवल
I रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
I आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)













मा.सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

सौ.चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

ALIBAG CO-OP URBAN BANK LTD. ALIBAG PIN 402 201

शुभेच्छुक
अलिबाग को- ऑप, अर्बन बँक लि., अलिबाग-रायगड
श्री. बी.सी. मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. सुभाष म्हात्रे
उपाध्यक्ष
संचालक मंडळ व कर्मचारी वृंद.

सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. लंकेश नागावकर
सदस्य, अलिबाग तालुका
शेकाप पुरोगामी युवक संघटना

Mrs. Supriyatai Jayant Patil
and
Mrs. Chitralekha Nrupal Patil
Happy Birthday

Sky spark
INFRAPROJECTS PVT. LTD.

Skyspark Infraprojects Pvt. Ltd

Director Name : MR. SIDDHESH PRAKASH BAGWE
MR. MAYUR MOHAN BRID

13, Municipal Industral Estate K.K. Marg,
Jacob Circle, Mumbai 400 011

सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
संचालक
श्री. शंकर हरिभाऊ म्हसकर
श्री. मारुती सहदेव खांडेकर
श्री. बबन हरीभाऊ म्हसकर
श्री. महेंद्र नामदेव पोटफोडे
श्री. रामचंद्र सिताराम चितळकर
श्री. नंदकुमार कृष्णा कापसे
श्री. नरेंद्र तानाजी जाधव
श्री. मनोहर गोपाळ मांजरे
सौ. मालती मारूती खांडेकर
सौ. अस्मिता अनंत धाडसे
सौ. संगिता सुरेश वाघमारे
श्री. लंकेश भगवान नागावकर (सचिव)
श्री. संजय धोंडू शेळके (सहसचिव)
गणेश बा.म्हसकर
चेअरमन
बाळाराम मा. धामणसे
व्हा. चेअरमन
मुठवली विविध कार्यकारी सहकारी सोसायटी प्रा.लि.

सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
ॲड. परेश देशमुख
संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
शुभेच्छुक
आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
मा.श्री. राजेंद्र जुईकर
अध्यक्ष
मा.श्री. अजित नामदेव भगत
उपाध्यक्ष
रा.जि.सह. बँक कर्मचारी संघ

सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. शैलेश पाटील
मा. उपसरपंच ग्रुप ग्रामपंचायत ताडवागळे,
मा. अध्यक्ष, शिवसागर गडपंचक्रोशी
सदस्य, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ
श्री. नरेश म्हात्रे
मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव
शेकाप सहचिटणीस अलिबाग तालुका


सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. विजय कृष्णा गिद्दी
संचालक-आरडीसीसी बँक
मा. अध्यक्ष-महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबई
सौ. नीता विजय गिद्दी
माजी सभापती,
पंचायत समिती, मुरुड


सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
PNP
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटी
अलिबाग– रायगड


सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. निखील कवळे
प्रभारी सरपंच, ग्रामपंचायत नवेदर नवगाव
आणि कवळे परिवार


सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. राजेंद्र वसंत म्हात्रे
मा. सरपंच, ग्रामपंचायत काविर


सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
निहार प्रॉपर्टी ॲण्ड लिगल सोल्युशन
डॉ.ॲड. निहा अनिस राऊत
ॲड. अनिस राऊत


सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह
सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. तुकाराम दामोदर पाटील
ज्येष्ठ कार्यकर्ते,
शेतकरी कामगार पक्ष मुरुड
श्री. अमोल काशिनाथ पाटील
सदस्य,
ग्रुप ग्रामपंचायत,
शिघ्रे


Mrs. Supriyatai Jayant Patil
and
Mrs. Chitralekha Nrupal Patil
HAPPY
Birthday
Ansh
fire protection systems
With Best Compliments From
Mr. Ashish S Sakpal
Specialised Contractors & Consultant for:
Fire Hydrant Systems, Sprinkler Systems
& Fire Alarm Systems.
Authorised Licensed Agency of:
Directorate of Maharashtra Fire Services
(Govt. of Maharashtra)
A-305, Prabhu Krupa Apartment
Opp. Bethel Church, Kohojgaon,
Ambernath (West),
Dist. Thane - 421501
+91 9623 44 99 66
+91 9503 667567
info@anshfire.in


HAPPY BIRTHDAY
Mrs. CHITRALEKHA NRUPAL PATIL
Chief, PWP Woman Front (Raigad District)
Secretary - P.N.P. Education Society
With Best Compliments From
RAJENDRAN
& ASSOCIATES
Architect, Structural
Engineers & PEB Specialist
33, Sadicha Building, Station Road, Thakurli (E),
Dombivli, Thane – 421 201.
Mob : 9930627906 | Email : rajendravkurup@yahoo.co.in

## सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक
**श्री. सुरेशशेठ खैरे**
व्हाईस चेअरमन, रा.जि. मध्यवर्ती बँक लि. अलिबाग

---

## सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

मा. श्री. क. तु. वाघमोडे, चेअरमन
मा. श्री. भारत नांदगावकर, व्हा. चेअरमन
मा.श्री. राजेंद्र जुईकर, ऑनररी सेक्रेटरी

श्री. शिवाजी बाबासाहेब भोसले, संचालक
श्री. संदेश कृष्णा पवार, संचालक
श्री. प्रफुल्ल केशव पाटील, संचालक
श्री. नरेश जोमा कोळी, संचालक
श्री. सतीश बबनराव देशमुख, संचालक
श्री. समीर रमेश देशमुख, संचालक
श्री. संजीव श्रीकांत देशमुख, संचालक
श्री. नितीन आनंदराव जाधव, संचालक
श्री. अरविंद अनंत पाटील, संचालक
श्री. मधुकर मामु ढेबे, संचालक
सौ. उषा कैलास जाधव, संचालिका
सौ. वृषाली महेंद्र वैद्य, संचालिका
श्री. मिलिंद विनायक वाड, तज्ज्ञ संचालक

**दि रायगड बँक स्टाफ को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., पेण**

---

With Best ComplimentsFrom
Jayanti Shah - 09422594552

# Janata Cloth Stores
■ Uniform Specialist
■ Exclusive Family Showroom

Just..... Her's
ladies under garments
Ph. : 07798030047 (02141) 227172

Mrs. Supriyatai Jayant Patil
HAPPY Birthday
Mrs. Chitralekha Nrupal Patil

ADD : 2-Om Sai Apt. Bazar Peth, Alibag, Dist. Raigad - 402 201

---

## सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
**ॲड. राहुल नाईक**
पत्ता : चिंचपागली, मु. नागाव ता. अलिबाग, जि. रायगड मो. ९९२२७९८५२८

---

## सौ. सुप्रियाताई ज. पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृ. पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
**श्री. अनिल पाटील**
माजी पं.स. उपसभापती, अलिबाग

**श्री. दिपक का. पाटील**
उपसरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, रेवस

---

## सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
**श्री. अनिल पाटील,**
माजी उपसभापती, पं.स. अलिबाग

---

## सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

**व्याघ्रेश्वर मुद्रक सहकारी संस्था मर्यादित**
अलिबाग-रायगड

---

## सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

**राज पोर्ट हँडलिंग औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित**

**शिवशंकर माथाडी कामगार चढउतार करणारी सहकारी संस्था मर्यादित, अलिबाग-रायगड**
घर क्र. ०७७, मु. खानाव, पो. उसर

**सुप्रिया पोर्ट हँडलिंग औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित**

**शिवशंकर मजूर सहकारी संस्था मर्यादित अलिबाग-रायगड**
मु. मुशेत, पो. मापगाव

**बिरुदेव मजूर सहकारी संस्था मर्यादित, अलिबाग**
फ्लॅट नं. ०२, तळमजला, विद्यानगर चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.

---

## सौ. सुप्रियाताई जयंत पाटील
संचालिका, दि. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई
अध्यक्षा-अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

## सौ. चित्रलेखा नृपाल पाटील
प्रवक्त्या, शेकाप महाराष्ट्र राज्य
पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

**श्री. कमलाकर गोविंद साखळे,** सभापती
**श्री. अशोक दत्तात्रेय म्हात्रे,** उपसभापती

शुभेच्छुक

स्वप्नील संजय पाटील, संचालक
अनंत हिराजी पाटील, संचालक
यशवंत लखमा भगत, संचालक
सलीम अब्बास तांडेल, संचालक
प्रमोद केशव ठाकूर, संचालक
श्रीम. संध्या नंदकुमार पाटील, संचालिका
श्री.संजय लक्ष्मण पाटील, संचालक
श्रीमती अशुप्रिता उदय वेळे, संचालिका
श्री. गजानन शाम झोरे, संचालक
अभिताभ दत्तात्रेय भगत, संचालक
भास्कर लक्ष्मण भोपी, संचालक
मुकेश मारूती नाईक, संचालक
श्रीम. अर्चना अविनाश हंबीर, संचालिका
श्री. सुभाष जयवंत वागळे, संचालक
श्री. प्रतिक अरूण पाटील, संचालक
श्री. खलील यूनूस तांडेल, संचालक

**कृषी उत्पन्न बाजार समिती अलिबाग संचालक मंडळ २०२३-२०२८**

# लोकहितासाठी झटणाऱ्या चित्रलेखा पाटील

प्रा. स्नेहल पाटील

अलिबाग, रोहा आणि मुरुड तालुक्यात सामाजिक व राजकीय क्षेत्रात निःस्वार्थ भावनेने कार्यरत असलेल्या चित्रलेखा नृपाल पाटील ऊर्फ चिऊताई यांचा आज वाढदिवस. समाजातील सर्वसामान्य, दुर्बल व वंचित घटकांना न्याय मिळावा, विशेषतः महिलांना आणि मुलींना सक्षमतेची जाणीव व्हावी, या उद्देशाने त्यांनी आपले कार्य उभे केले आहे.

समाजसेवा अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी त्यांनी एक समाजसेवी संस्था (फाऊंडेशन) स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी विशेषतः मुली व महिलांच्या शिक्षण, सक्षमीकरण आणि स्वावलंबनासाठी अनेक उपक्रम राबवले. ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू मुलींना शाळेत जाण्यासाठी मोफत सायकली उपलब्ध करून देत शिक्षणाची वाट मोकळी केली, तसेच गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलींना मोफत शिक्षण, शैक्षणिक साहित्य व योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवले आहे.

महिलांना केवळ मदतीपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना स्वतःची ओळख निर्माण करून देणे, विविध सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक उपक्रमांत सक्रिय करणे, तसेच त्यांच्या कलागुणांना व कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. त्या महिलांशी नेहमीच मैत्रिणीसारख्या नात्याने संवाद साधतात, त्यांच्या अडचणी ऐकून घेतात आणि त्यांना मानसिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहतात.



महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे आणि नेतृत्वगुण विकसित करावेत, या उद्देशाने त्यांनी विविध महिला संघटना स्थापन केल्या. या संघटनांच्या माध्यमातून अनेक महिलांना जबाबदारीची पदे देत 'स्त्री कुठेही कमी नाही' ही जाणीव समाजमनात रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे.

यासोबतच वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत त्या नेहमीच मदतीसाठी एक पाऊल पुढे राहिल्या आहेत. गरजू रुग्णांसाठी रुग्णालयीन मदत, संपर्क, मार्गदर्शन तसेच आवश्यक त्या वेळी तातडीची मदत उपलब्ध करून देण्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. कोरोना महामारीच्या कठीण काळात त्यांनी लोकांच्या मदतीसाठी धाव घेऊन अन्नधान्य, औषधे, आरोग्यविषयक सर्वतोपरी मदत आणि मानसिक आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

त्या केवळ आश्वासने देणाऱ्या नाहीत, तर दिलेल्या शब्दांना पूर्णत्वाने खरे करणाऱ्या आहेत. वाटेत अपयश आले, अडचणी आल्या तरीही त्या कधीही खचल्या नाहीत. अपयशाकडे अनुभव म्हणून पाहात, न डगमगता, निर्धाराने आणि ठामपणे लोकहितासाठी उभ्या राहणारी ही त्यांची खरी ओळख आहे.राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी विकासाभिमुख दृष्टिकोन ठेवून स्थानिक प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. पारदर्शकता, प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि लोकांशी थेट संवाद हे त्यांच्या कार्याचे ठळक वैशिष्ट्य आहे. त्यामुळे अलिबाग, रोहा आणि मुरुड परिसरात त्यांनी एक विश्वासार्ह, सकारात्मक आणि प्रेरणादायी प्रतिमा निर्माण केली आहे.

अशा या समाजासाठी अखंडपणे कार्यरत असलेल्या कर्तृत्ववान समाजसेविका व नेत्या चित्रलेखा नृपाल पाटील यांना वाढदिवसानिमित्त उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि त्यांच्या समाजोपयोगी कार्याला अधिक बळ व यश लाभो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.**

# अस्सल मातीतलं नेतृत्व 'चित्रलेखा पाटील'

माधवी सावंत

शेतकरी कामगार पक्षाने महिलांना कायमच सक्षम करण्यावर भर दिला आहे. शेकापने दिलेल्या संधीचे सोनं करीत चित्रलेखा पाटील यांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. गावपातळीत उभं राहिलेलं हे अस्सल मातीतलं नेतृत्व आहे. आज बचतगटांच्या माध्यमातून अनेक स्त्रियांना सक्षम करण्याचं काम त्यांनी केलं आहे. उच्चशिक्षित असल्यामुळे गरीब असो वा श्रीमंत, प्रत्येकाचे जिव्हाळ्याचे प्रश्न घेऊन त्या काम करीत आहेत. हे नेतृत्व अचानक आलेलं, कुणी कुणावर लादलेलं, पैसा कमविण्याच्या हेतूनं, सूडबुद्धीनं, स्वार्थासाठी या पद्धतीने आलेलं नाही. तर, तळागाळातील जनतेच्या मनातून हे उभं राहिलं आहे. त्यांचं नेतृत्व हे मातीतून घडलं आहे.

सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत, अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहण्याची त्यांची भूमिका अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. सामाजिक बांधिलकी, स्पष्ट भूमिका, राजकारणात सक्रिय असलेलं, तरुणांसाठी लढणारं, महिलांच्या पाठीशी हक्कानं उभं राहणारं, जनहिताचा विचार करणारं नेतृत्व आणि लोकहितासाठी सातत्याने केलेल्या कार्यामुळे समाजकारणारसह राजकारणात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या तथा मिडिया सेलच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! सामाजिक जीवनात सक्रिय असतानाच समाजातील दुर्बल घटकांसाठी आवाज उठवणे, विकासकामांना गती देणे आणि महिलांना सक्षम बनवण्यासाठी केलेले प्रयत्न त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य राहिले आहे.



संवेदनशीलता आणि कणखर निर्णयक्षमता यांचा सुंदर समतोल त्यांनी आपल्या नेतृत्वातून साधला आहे. राजकीय, सामाजिक, शेक्षणिक क्षेत्रातील प्रवासात त्यांनी केवळ पदाला महत्त्व न देता जबाबदारीला अग्रक्रम दिला. सामान्य नागरिकांचे प्रश्न, महिलांचे हक्क, युवकांचे भविष्य आणि विकासाचे मुद्दे यासाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला. संघर्षमय परिस्थितीतही न डगमगता निर्णय घेण्याची क्षमता, प्रशासनाशी प्रभावी संवाद आणि जनतेच्या विश्वासावर उभे असलेले नेतृत्व ही त्यांच्या कार्यशैलीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. अनेक वेळा विरोधाचा सामना करतानाही त्यांनी लोकहिताची भूमिका सोडली नाही. त्यामुळेच त्या केवळ नेत्या नसून समाजातील अनेक घटकांसाठी आशेचा आधार बनल्या आहेत. महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि पारदर्शक प्रशासन या मूल्यांवर ठाम राहून त्यांनी राजकारणात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला. विविध विकासकामांद्वारे त्यांनी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीतून विश्वास निर्माण केला आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुण आणि महिलांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आहे. राजकारण हे केवळ सत्तेचे गणित नसून ते समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते, याचा प्रत्यय देणाऱ्या मोजक्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे चित्रलेखा पाटील. जनतेशी थेट नाळ, प्रश्नांबाबत स्पष्ट भूमिका आणि लोकहितासाठी अखंड झटणारी कार्यशैली यामुळे त्यांनी राजकारणात स्वतःची स्वतंत्र व ठाम ओळख निर्माण केली आहे. चित्रलेखा पाटील यांचे राजकारण हे नेहमीच जमिनीवरचे, वास्तवाशी जोडलेले राहिले आहे. सामान्य नागरिकांचे रोजचे प्रश्न पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. लोकांच्या अडचणी ऐकून घेणे, त्या प्रशासनापर्यंत पोहोचवणे आणि त्यावर ठोस उपाययोजना होईपर्यंत पाठपुरावा करणे, ही त्यांची कार्यपद्धती आहे.

### महिला सक्षमीकरणाची ठोस भूमिका

महिलांच्या प्रश्नांबाबत चित्रलेखा पाटील यांची भूमिका नेहमीच स्पष्ट आणि आक्रमक राहिली आहे. महिलांना न्याय, समान संधी आणि सुरक्षितता मिळावी यासाठी त्यांनी विविध स्तरांवर आवाज उठवला. महिलांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे, त्यांना नेतृत्वाची संधी मिळावी यासाठी पाठबळ देणे, हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे अंग राहिले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे अनेक महिलांना आत्मविश्वास मिळाला.विकास ही केवळ घोषणांची बाब नसून ती कृतीतून दिसली पाहिजे, यावर चित्रलेखा पाटील यांचा ठाम विश्वास आहे. विकासकामांमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि वेळेचे भान या बाबींवर त्यांनी नेहमीच भर दिला. प्रशासनाशी समन्वय राखत त्यांनी जनतेच्या अपेक्षांनुसार कामे पूर्ण होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

### तरुणांसाठी प्रेरणास्थान

आजच्या तरुण पिढीला केवळ भाषणांपेक्षा कृतीची गरज आहे. चित्रलेखा पाटील यांचे कार्य आणि संघर्षमय प्रवास तरुणांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. स्वच्छ प्रतिमा, स्पष्ट विचार आणि लोकहिताची निष्ठा या मूल्यांवर आधारित राजकारण शक्य आहे, हे त्यांनी आपल्या वाटचालीतून दाखवून दिले आहे. राजकारणात विश्वास टिकवणे हे सर्वांत मोठे आव्हान असते. मात्र चित्रलेखा पाटील यांनी जनतेचा विश्वास आपल्या कार्यातून कमावला आहे. निवडणुकीपुरते मर्यादित न राहता सतत जनतेत राहणे, त्यांच्या सुख- दुःखात सहभागी होणे, ही त्यांची ओळख बनली आहे. त्यामुळेच त्यांचे नेतृत्व केवळ पदापुरते मर्यादित न राहता लोकांच्या मनात घर करून राहिले आहे.

कोरोनामुळे जीवाला असलेला धोका, त्यात लॉकडाऊनचा फटका आणि त्यावर निसर्ग वादळाचा तडाखा अशा तिहेरी संकटात अडकलेल्या अलिबागकरांसाठी हक्काने रस्त्यावर उतरणाऱ्या चिऊताईंना लाल सलाम! या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि जनसेवेसाठी अधिक बळ लाभो, अशी सर्व स्तरांतून अपेक्षा व्यक्त होत आहे. लोकहितासाठी सुरू असलेला त्यांचा संघर्ष आणि योगदान असेच अखंड सुरू राहो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा. **





















# जनसामान्यांचा ध्यास असणाऱ्या ताई

**आपल्या कर्तृत्वाने, राजकीय, सामाजिक, पत्रकारिता, आदी विविध क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या, सर्वसामान्यांच्या सुख- दुखःत सहभागी होणाऱ्या, आपल्या मनमिळावू स्वभावाने सर्वांना आपलेसे करणाऱ्या, सर्वांच्या लाडक्या ताई, रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील यांचा आज वाढदिवस. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा देत असताना त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.**

**प्रमोद जाधव**



ताईंना जनसामान्यांच्या विकासाचा ध्यास कायमच राहिला आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यामध्ये त्यांची एक वेगळी ख्याती आहे. रायगडचे भाग्यविधाते, कष्टकरी, कामगारांचे नेते स्व.प्रभाकर पाटील यांच्या स्नुषा, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या त्या पत्नी, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांची मोठी बहीण सुप्रिया पाटील उर्फ ताई या एक संस्कारक्षम महिला म्हणून नाव घेणे वावगे ठरणार नाही. भाई जयंत पाटील यांच्या राजकीय, सहकार, सामाजिक वाटचालीत अर्धांगिनी म्हणून सुप्रिया पाटील यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.

शेतकरी कामगार पक्षाने सोपविलेली जिल्हा महिला आघाडी प्रमुख म्हणून जबाबदारी त्यांनी खंबीरपणे सांभाळली. महिला सक्षमीकरणाचा ध्यास घेत महिलांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्याध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. वेगवेगळ्या उपक्रमांमधून महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न त्यांनी कायमच केला आहे. त्यांच्या संकल्पनेतून साकार झालेले हळदी कुंकू समारंभाचा बोलबालबाला आजही जिल्ह्यात आहे. गेल्या ३० वर्षापुर्वी हळदी कुंकू समारंभाचे लावलेले रोपटे आज वटवृक्षात रुपांतरीत झाले आहे. त्यावेळी हळदी कुंकू समारंभाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व महिलांना एकत्र आणण्याचे काम केले. अलिबाग शहरामधून सुरू केलेला हा समारंभ आज जिल्ह्यातील घराघरात पोहचला आहे.जानेवारी महिना उजाडल्यानंतर जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्रातील महिलांनी या समारंभाची उत्सुकता लागलेली असते. त्यामुळे हळदीकूंक हा समारंभ एक महत्वाचा ठरला आहे. विचारांची देवाणघेवाण हळदी कुंकू समारंभासारख्या उपक्रमातून निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

धकाधकीच्या जीवनातून सर्व स्तरातील महिलांना थोडा निवांत वेळ मिळावा. कायमच घरातील कामकाज अडकणाऱ्या महिलांना व्यक्त होण्यासाठी हक्काचे व्यासपिठ मिळावे, अनुभवांबरोबरच विचारांची देवाण घेवाण करता यावी, सर्व महिलांना नवी उमेद मिळावी, यासाठी १९९५ साली कृषीवल हळदीकुंकू या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला कृषीवल कार्यालयाच्या आवारात हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी दोन हजार महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. महिलांच्या वाढत्या उत्साहातून या समारंभाची व्याप्ती प्रचंड वाढली आहे. २५ हजारहून अधिक महिला या समारंभाला दरवर्षी भेट देत विचारांची देवाण घेवाण करीत आहे. महाराष्ट्राची परंपरा जपणारा हळदीकुंकू सोहळा महाराष्ट्रातील नंबर एक म्हणून नावारुपाला येत आहे. सुप्रिया पाटील यांनी सुरु केलेली चळवळ आज वेगळ्या उंचीबरोबरच वेगळ्या रुपातही दिसून येत आहे. या चळवळीला उभारी देण्याचे काम शेकाप प्रवक्त्या तथा सुप्रिया पाटील यांच्या स्नुषा चित्रलेखा पाटील यांनी केले आहे. अलिबागसह रोहा, पाली अशा अनेक ठिकाणी हा सोहळा साजरा करून महिलांना एका छताखाली आणण्याचे काम चित्रलेखा पाटील करीत आहेत. शेतकरी, कष्टकरी, कामगारांच्या अन्यायाविरोधात लढा देत असताना, ७ जून १९३६ साली स्व. नारायण नागू पाटील यांनी इंग्रजी राजवटीच्या काळात कृषीवल नावाचे वृत्तपत्र सुरु केले. जनसामान्यांचा आरसा असणारी वृत्तपत्राची ही चळवळ नारायण नागू पाटील यांच्यानंतर स्व. प्रभाकर पाटील यांनी पुढे चालू ठेवली. अखंडपणे वाचकांना सेवा पुरविण्याचे काम कृषीवलने केले आहे. काही वर्षानंतर सुप्रिया पाटील यांच्याकडे कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालिका म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांचा हा वारसा चित्रलेखा पाटील यांनी जपण्याचा कायमच प्रयत्न केला आहे. बदलत्या युगाबरोबर कृषीवलचा आकार आणि स्वरुप बदलताना अद्ययावत तंत्रज्ञानाचा आणि यंत्रसामुग्रीचा वापर करून कृषीवलची गुणवत्ता आणि सुबकता वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न कायमच केला. सुप्रियाताई पाटील या गेल्या अनेक वर्षापासून रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षा आहेत.

पत्रकारांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न त्यांनी कायमच केला आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा म्हणून काम करीत असताना रायगड जिल्ह्याचा विकासाकडे त्यांनी लक्ष दिले आहे. जिल्हा परिषदेच्या पहिल्या महिला अध्यक्षा होण्याचा मान सुप्रिया पाटील यांना मिळाला आहे. राजकीय, सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रात काम करीत असताना त्यांनी सहकार क्षेत्रातील जबाबदारी खंबीरपण सांभाळली आहे. अलिबाग अर्बन बँकेच्या संचालिकापासून चेअरमनपद त्यांनी सांभाळले आहे. यशस्वी चेअरमन म्हणून काम पाहिले आहे. त्या कारकिर्दीत अलिबाग अर्बन बँकेचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात टाकलेले पाऊल यशस्वी करून दाखविले आहे. चढत्या कमानींनी सर्व पदे त्यांना मिळाली, परंतु आपण कोणीतरी इतरांपेक्षा मोठे आहोत हे त्यांनी कधीही समाजात वावरताना दाखविले नाही. सर्वस्तरातील घटकांचा त्यांनी आदर केला आहे. वेळप्रसंगी अडचणीत असलेल्या व्यक्तींना मदतीचा हात देण्याचे काम केले आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते, सर्वांचे आधारस्तंभ, माजी आ. जयंत पाटील यांच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, सहकार क्षेत्रातील यशस्वी कार्यात, वाटचालीत अर्धांगिनी म्हणून सुप्रियाताईंचा मोलाचा वाटा राहिला आहे. समाजकारण हाच ध्यास असणाऱ्या, मदतीस तत्पर असणाऱ्या सुप्रिया पाटील उर्फ ताई यांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा. **

# पीएनपी होली चाईल्ड स्कूलचे 'गुणदर्शन'



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या 'प्रभाविष्कार' अंतर्गत होली चाईल्ड स्टेट बोर्ड स्कूल वेश्वी शाळेचा विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून सिने अभिनेत्री, तसेच नाटक, मराठी, हिंदी अल्बम साँगमध्ये विविध भूमिका साकारणारी प्रसिद्ध अभिनेत्री डॉ. जुईली टेमकर उपस्थित होत्या. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कारचे सादरीकरण केले. यावेळी स्टेट बोर्ड मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य रविंद्र पाटील, अकॅडमिक डायरेक्टर राजश्री पाटील, लेखापाल मनिषा रेलकर, अंकित भानुशाली, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आदींसह इतर मान्यवर, शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.












( छायाचित्र – अमोल नाईक )

# आरोग्यवर्धक शेवगा हंगामातच गायब

## ■ बाजारात येण्यासाठी १५ ते २० दिवसांचा अवधी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पारंपरिकखाद्यसंस्कृतीतशेवगा पोषणमूल्यांचा अमूल्य स्रोत मानला जातो. झाडाच्या शेंगा, पाने, फुले, सालीपर्यंत प्रत्येक घटक पोषणाने परिपूर्ण असल्याने आहारात महत्त्व आहे; मात्र यंदा थंडी सुरू होऊनही बाजारातून शेंगा गायब असल्याचे चित्र आहे. हिवाळ्यात शेवग्यांच्या शेंगांना मोठी मागणी असते. दोन महिन्यांपूर्वी बाजारात शेवग्याच्या शेंगा उपलब्ध होत्या; मात्र गेल्या दीड महिन्यापासून त्या बाजारातून पूर्णपणे गायब झाल्या आहेत.

डिसेंबर सुरू होऊनही ग्रामीण भागातील शेवग्याची झाडे फुलांनी भरलेली दिसत आहेत; परंतु शेंगा अजून तयार झालेल्या नाहीत. साधारण १५ ते २० दिवसांनंतर शेंगा तयार होण्याची शक्यता आहे. सध्या शहरी भागात शेवगा मर्यादित प्रमाणात उपलब्ध असून किलोला २५० ते ३०० रुपये दराने विकला जात आहेशेवग्याचे झाड केवळ अन्नाचा स्रोत नसून नैसर्गिक औषधालय आहे. त्यामुळे प्रत्येकाने नियमित आहारात सम ावेश करावा, असे मत तज्ज्ञ व्यक्त करतात. शेवग्याच्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए, सी, ई, कॅल्शिअम, पोटॅशियम आणि आयर्न मुबलक प्रमाणात असते. पानांचे नियमित सेवन रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.

# रोटरी पनवेल फेस्टिवलचे आयोजन

**नवीन पनवेल :** कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी मैदान, पनवेल येथे रोटरी क्लब ऑफ पनवेल आणि रोटरी फाउंडेशन पनवेल आयोजित रोटरी पनवेल फेस्टिवलचे आयोजन २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी चार ते रात्री १० वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

रोटरी पनवेल फेस्टिवलचे आयोजन पनवेल परिसरात केले जाते. दहा दिवसांच्या या रंगतदार दिवसांमध्ये आनंद, मजा आणि उत्साह असतो. जवळपास दोन लाखांपेक्षा अधिक नागरिक या फेस्टिवलला भेट देतात. यावेळी असंख्य आकर्षक, ग्राहकोपयोगी वस्तू खरेदीची संधी मिळते, चवदार खाद्यपदार्थांची मेजवानी रोटरी फेस्टिवलमध्ये असते तसेच आकर्षक करमणुकीच्या कार्यक्रमांची रेलचेल देखील असते. रोटरी पनवेल फेस्टिवलचे हे २८ वे वर्ष असून कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीचे मैदान येथे २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर रोजी या फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिवलला उपस्थित राहून आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# जल्लोष विजयाचा



• (छायाचित्र : समीर मालोदे)